पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.
RNI NO. MAHMAR/2013/57952

आतील पानात...
३ ग्रामपंचायतची बँकेत अकरा लाखाची एफडी
४ आ. काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वात जनता दरबाराचे यशस्वी आयोजन
५ तनपूरे यांच्या उपोषणाला पाठिंबा;

पान ८ वर..



गुरुवार, दि. १७ एप्रिल, २०२५ | वर्ष : १३ | अंक : १०० | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

# ‘माथी भडकवायची अन् सत्ता लाटायची’

## आ. गोपीचंद पडळकरांची शरद पवारांवर घणाघाती टीका



**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीची सुरक्षा वाढवली पाहिजे. याठिकाणी आणखी २० पोलीस सुरक्षेसाठी तैनात केले पाहिजेत. संभाजी ब्रिगेडन टोकाची भूमिका मांडते. २०१२ साली असाच काहीसा प्रयत्न झाला होता. वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत राज्य सरकारने ठाम भूमिका घेतली पाहिजे, असे वक्तव्य आमदार गोपीचंद पडळकर यांनी व्यक्त केले. ते बुधवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी गोपीचंद पडळकर यांनी शरद पवार यांच्यावरही टीकास्त्र सोडले.

आ.गोपीचंद पडळकर म्हणाले, ’जेव्हा ब्रिगेडींचा नेता संकटात येतो तेव्हा असं काहीतरी खुसपट ते काढतात. शरद पवारांना फॉर असणाऱ्या या संघटना असा नवीन इतिहास काढत असतात, त्यामुळे हे वाद तयार होतात. ब्राह्मणांना टोकाचा विरोध करायचा आणि बहुजनांची माथी भडकवायची आणि त्यातून सत्ता लाटायची हा उद्योग गेले अनेक वर्ष सुरू होता. पण २०१४०, २०१९ आणि २०२४ साली लोकांनी हा उद्योग उडवून लावला,’ असे म्हणत पडळकर यांनी पवारांवर निशाणा साधला आहे.तर, ’माझी शरद पवारांना आता एक विनंती आहे त्यांनी त्यांचा सगळा पक्ष अजित पवारांकडे दिलेला आहे, त्यामुळे त्यांच्याकडे आता फावला वेळ आहे. या वेळात त्यांनी त्यांना पाहिजे तसा इतिहास लिहावा. एखाद्या जातीला कसं टार्गेट करायचं, कोणती जात मातीत घालायची, कुठल्या महापुरुषाला वर काढायचं, कुठल्या महापुरुषाचे नाव घेतल्यानंतर मतांचं राजकारण होईल. कुठल्या जातीला जास्त शिव्या दिल्यानंतर जास्त मतं आपल्या बाजूला येतील. पुढच्या दोन-चार पिढ्या मातीत कशा जातील. अशा पद्धतीचा इतिहास त्यांनी एकदाच लिहून टाकावा. त्यामुळे परत परत नव्याने इतिहास लिहिण्याची गरज पडणार नाही,’ असे देखील गोपीचंद पडळकर म्हणाले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त पुण्यात धनगरी नाद हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार असल्याचे गोपीचंद पडळकर यांनी सांगितले आहे. मात्र या कार्यक्रमाला अजित पवार हे असणार आहेत का? असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, ’नाही येणार आम्ही त्यांना बोलावलेचं नाही.’ असं थेट पडळकर म्हणाले आहेत.

# डीपीसीतील कामे जुलैअखेर सुरू करा; जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सूचना

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२५-२६ वर्षीच्या कामांना मे महिन्यात प्रशासकीय मान्यता देऊन येत्या जून-जुलैमध्ये निविदा काढून संबंधितांना कार्यारंभ आदेश द्यावेत. तसेच सप्टेंबर ते डिसेंबरदरम्यान विकासकामे पूर्ण करावीत. डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२६ या तीन महिन्यांत करायची आहे. काही कामांची तपासणी करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रशासनाला दिले आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०२४-२५ या वर्षीच्या कामकाजांचा आढावा आणि २०२५-२६ या वर्षात करण्यात येणाऱ्या कामाबाबत डुडी यांनी मंगळवारी (दि. १५) आढावा घेतला. त्यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी



गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर उपस्थित होते.

डुडी म्हणाले, २०२४-२५ मधील कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करा. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील कामे ऑगस्टपर्यंत पूर्ण करावीत. २०२४-२५ चा निधी शंभर टक्के खर्च करण्यात आला आहे. डीपीसीतील २०२५-२५ या आर्थिक वर्षात कामे सुचविताना स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करूनच कामे सुचवा. ज्या जागांचे मालमत्तापत्रक वादविरहित आहे, अशाच मालकीच्या जागांवरच कामे सुचविण्यात यावी. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कामांसाठी ३१ मेपर्यंत सर्व प्रशासकीय मान्यतांची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच जून, जुलैदरम्यान निविदा आणि कार्यारंभ आदेश द्यावेत. येत्या सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत कामांची गुणवत्ता राखून कामे पूर्ण करावीत.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील इमारत वगळता जनसुविधा, नागरी सुविधांच्या पूर्ण कामांसाठी निधी उपलब्ध करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. आतापर्यंत डीपीसीची बैठक उशिरा होत असे. यावर्षी नियमित वेळेत बैठक झाली असून डीपीसीच्या निधी खर्चाच्या कार्यपद्धतीत पालकमंत्री अजित पवार यांनी बदल सुचविले आहेत.

## संक्षिप्त

### दानवेंसोबतचा वाद मातोश्रीवर मिटला

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मला आमंत्रण नव्हते, पत्रिकेत माझे नाव नव्हते. मला डावलून कसे चालेल. उद्धव ठाकरे संकटात आहेत, एकत्र येऊन काम करावे लागेल. मेळाव्याचे अंबादास दानवेनी मला सांगितले नाही. मी उद्धव साहेबाना सांगणार आहे. तक्रार करणार आहे. अंबादास मोठा झाल्यासारखा वागतो, शिवसेना मी वाढवली. हा नंतर आला आणि काड्या करण्याचे काम करतो. तो मला बोलतच नाही. पक्ष चालवायचा असेल, तर एकत्र राहिले पाहिजे. या माणसांमुळे शिवसेनेतील अनेक लोक फुटले, या माणसाने काय केले सांगा. अनेक लोक सोडून जात आहेत, या शब्दांत ठाकरे गटाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी जाहीरपणे अंबादास दानवे यांच्याबद्दलची नाराजी बोलून दाखवली.

छत्रपती संभाजीनगरमधील ठाकरे गटातील दोन बड्या नेत्यांमधील धुसपूस पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली. एकीकडे ठाकरे गटाला लागलेली गळती थांबताना दिसत नाही, तर दुसरीकडे पक्षांतर्गत कुरघोडी होत असून, नेते एकमेकांबाबत उघडपणे नाराजी बोलून दाखवत असल्याने ठाकरे गटात सारेकाही आलबेल नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत खैरे यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर अंबादास दानवे यांच्यासोबत असलेला वाद मिटल्याचे चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. ते पत्रकारांशी बोलत होते.अंबादास दानवे आणि माझा वाद केव्हाच मिटला. उद्धव ठाकरे यांची भेट झाली. काही कार्यक्रमासंदर्भात चर्चा झाली. काही कार्यक्रम पक्षाकडून आखले जाणार आहेत. त्याबाबत त्यांच्याशी बोलणे झाले. यापुढे आम्ही दोघे मिळून एकत्र कार्यक्रम करणार आहोत, तो एकटा किंवा मी एकटा कार्यक्रम करणार नाही , सोबत म्हणून कार्यक्रम करणार आहोत.

### उर्दूचा जन्मच भारतातील धर्माशी जोडू नका : सर्वोच्च

जनप्रवास प्रतिनिधी

नवी दिल्ली : भाषा म्हणजे धर्म नाही. भाषा धर्माचे प्रतिनिधित्वही करत नाही. भाषा ही समुदायाची, प्रदेशाची आणि लोकांची असते. उर्दू भाषा भारतासाठी परकीय भाषा आहे हा एक पूर्वग्रह आहे. मराठी आणि हिंदीप्रमाणेच उर्दू ही एक इंडो-आर्यन भाषा आहे. तिचा जन्मच भारतीय भूमीत झाला आहे. त्यामुळे तिला कोणत्याही धर्माशी जोडता येत नाही, असे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेचा नामफलकावरील उर्दू भाषेचा वापर योग्य असल्याचे स्पष्ट केले.

# सिंहगड कॉलेज परिसरात दहशत पसरवणाऱ्या गुंडाला पोलिसांनी केली अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: सिंहगड कॉलेजमध्ये दहशत पसरविणारा व हत्याराने वार करुन जखमी करणाऱ्या गुंडाला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. ज्या कॉलेजच्या परिसरात त्याने दहशत माजविली होती. त्याच परिसरात पोलिसांनी त्याची धिंड काढली. तन्मय सखाराम भुसारी (वय २०, रा. सिंहगड कॅम्पस, वडगाव, मुळ रा. बुलढाणा) असे या गुंडाचे नाव आहे. याबाबत रिहान महंमद होडगी (वय १८, रा. आंबेगाव) यांनी भारती विद्यापीठ पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. रिहान हा पूर्वी सिंहगड लॉ कॉलेजसमोरील समर्थ चहाच्या टपरीवर काम करत होता. ८ एप्रिल रोजी पहाटे साडेचार वाजता तो रिक्षा घेऊन निघाला होता. चहा पिण्यासाठी तो समर्थ चहाची टपरीवर गेला होता. त्याच्या तोंड ओळखीचे तन्मय भुसारी व ज्ञानेश्वर हे दोघांबरोबर भांडणे करत होते. तेव्हा त्याने तन्मय भुसारी याला कशाला भांडणे करता, असे विचारले. त्यावर तन्मय याने तु मला



मारणार का, असे म्हणून धारदार हत्याराने रिहान याच्यावर वार करुन गंभीर जखमी केले होते. पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. तन्मय भुसारी याला १२ एप्रिल रोजी अटक केली.

सिंहगड कॉलेजवर रिहान याच्यावर हत्याराने वार करुन तन्मय याने दहशत पसरविल्याने विद्यार्थ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. या करीता वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळ-ाराम साळगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या ठिकाणी हा प्रकार घडला होता, त्या समर्थ चहाची टपरी परिसरात तन्मय भुसारी याला फिरविण्यात आले.

# घरगुती गॅस दरवाढी विरोधात ठाकरे गटाचे आंदोलन

## चुलीवर भाकरी थापून केला अनोखा निषेध

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड : पंतप्रधानांच्या उज्वला गॅस योजनेत केंद्र सरकार ने ५० रुपयांनी दरवाढ केल्याने शिवसेना ठाकरे गटाकडून निषेध करण्यात आला आहे. पिंपरी च्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात शिवसेना ठाकरे गटाकडून निषेध करण्यात आला. चुलीवर भाकरी थापून अनोख आंदोलन करण्यात आलं. मोदी सरकार हाय - हाय च्या जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी ठाकरे गटाचे संजोग वाघेरे यांच्यासह इतर महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



यावेळी संजोग वाघेरे म्हणाले, आमच्या महिला भगिनींना दरवाढीचा सामना करावा लागतो. या दरवाढीचा आम्ही निषेध करत आहोत. चुलीवर भाकरी बनवून महिला कार्यकर्त्यांनी याचा निषेध केला आहे. मोदींनी सांगितलं होतं अच्छे दिन आले आहेत. महिलांना चुलीवर स्वयंपाक करण्याची गरज नाही. उज्वला योजना आणली. पण, ५० रुपयांनी या योजनेत दरवाढ केल्याने महिलांमध्ये नाराजी आहे.

एकीकडे महिलांबाबत सहानुभूती दाखवता आणि दुसरीकडे महिलांकडून पैसे उकळत आहेत. असा आरोप संजोग वाघेरे यांनी केला आहे. केंद्र सरकार चा आम्ही निषेध करत आहोत. लवकरात लवकर दरवाढ मागे घ्या अन्यथा यापेक्षा अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संजोग वाघेरे यांनी दिला आहे. यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी देखील तीव्र शब्दात मोदी सरकार चा निषेध केला आहे.

# देहूरोड येथे अपघातात दोन सख्खा भावांचा जागीच मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**


पुणे : देहूरोड येथील केंद्रीय विद्यालयाजवळ सोमवारी (ता. १४) रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दोन सख्खा भावांचा मृत्यू झालाय. या घटनेने मोठी खळबळ निर्माण झालीये. दीपक राजोरिया (वय ३४) आणि योगेश राजोरिया (वय ३१) यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. दुचाकीवरील ताबा सुटल्याने गाडी घसरली आणि अपघात झाल्याचे सांगितले जातंय. घटनेची माहिती मिळताच लोक मोठ्या संख्येने घटनास्थळी पोहोचले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, देहूरोड येथील असणाऱ्या पारशी चाळ येथील रहिवासी दीपक राजोरिया आणि योगेश राजोरिया हे दोन सख्खे भाऊ दुचाकीवरून प्रवास करत होते. दुचाकीचा वेग असल्याने दुचाकीवरील त्यांचा ताबा सुटल्याने ती घसरली आणि दोघेही रस्त्यावर पडले. या अपघातात दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. ज्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी त्वरित बचावकार्य हाती घेतले आणि दोघांचे मृतदेह पुढील तपासणीसाठी वायसीएम रुग्णालयात पाठवले.

# परवानगी न घेता कोचिंग क्लासेस चालवणारे व विद्यार्थ्यांना भडकवणाऱ्यांवर कठोर कारवाई ; पोलीस आयुक्तांचा इशारा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : स्पर्धा परीक्षांच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासचालक भडकावून आंदोलन करण्यास प्रवृत्त करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाची परवानगी न घेता क्लास चालवणारे व विद्यार्थ्यांना भडकवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.



स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी संपूर्ण राज्यभरातून पुण्यात विद्यार्थी येतात. प्रामुख्याने सदाशिव आणि नवी पेठेमध्ये मोठ्या प्रमाणात अभ्यासिका, खानावळी, पुस्तकांची दुकाने आणि क्लासेस आहेत. त्यामुळे या परिसरात हजारो विद्यार्थी येतात. अनेक स्थानिकांनी राहत्या घरात आणि इमारतींमध्ये कोचिंग क्लासेस अभ्यासिका आणि हॉस्टेल्स सुरू केले आहेत. आता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी बहुतांश क्लासचालक विद्यार्थ्यांना भडकवून त्यांना आंदोलन करण्यास प्रवृत्त करत असल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा पुढे ढकलण्यासाठी आणि एमपीएससी, यूपीएससी आयोगाच्या विविध धोरणात्मक निर्णयाविरोधात आंदोलन करण्याची फूस लावत आहेत. त्यामुळे विद्यार्थी वारंवार आंदोलन करून नागरिकांसह पोलिसांना वेठीस धरत आहेत. दोन ते तीन महिने परीक्षा लांबणीवर पडल्यास खासगी क्लासचालक-मालक आर्थिकदृष्ट्या मालामाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस व महापालिका प्रशासनाकडून अभ्यासिका व कोचिंग क्लासेसच्या विविध परवान्यांची तपासणी करणार आहेत. तसेच यामध्ये काही त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिस आयुक्तांनी सांगितले.

# बिबवेवाडीतील गुंड सनी जाधवसह टोळीवर मोक्का

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : बिबवेवाडी परिसरात दहशत माजविणारा गुंड सनी जाधव याच्यासह त्याच्या टोळीतील साथीदारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्याचा आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले. गुंड माधव वाघाटे याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी सलमान शेख याने ३ फेब्रुवारी रोजी पवन गवळी याच्यावर गोळीबार करुन जखमी केले होते. या प्रकरणात पोलिसांनी सनी जाधव, सलमान शेख सह ९ जणांवर गुन्हा दाखल केला होता. टोळीप्रमुख सनी शंकर जाधव (वय २६, रा. चैत्रबन वसाहत, बिबवेवाडी), सलमान हमीद शेख (वय २५, रा. दिलासा अपार्टमेंट, बालाजीनगर, पुणे-सातारा रस्ता), हर्षल संतोष चव्हाण (वय १९, रा. पवळे चौक, कसबा पेठ), शक्ती गुरव (रा. लातूर) अशी मोक्का कारवाई केलेल्या गुंडांची नावे आहेत.

सनी जाधव याच्या टोळीवर खुनाचा प्रयत्न, खंडणी, बेकायदा शस्त्र बाळगणे, लुट, दहशत माजविणे, अशा गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. बिबवेवाडी परिसरात झालेल्या पवन गवळी याच्या खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यात पोलीस निरीक्षक सुरज बेंद्रे यांनी तपास करुन सनी जाधव, सलमान शेख, हर्षल चव्हाण या तिघांना अटक केली. शक्ती गुरव याचा शोध सुरु आहे.

# लोणीकंदमध्ये धूळप्रदूषणाचा विस्फोट; नागरीकांचे आरोग्य धुळीच्या भोवऱ्यात!

## प्रदूषण रोखण्याऐवजी गोंधळच वाढवताय कमिटी सदस्य? : नागरिकांमध्ये संताप

- लोणीकंदचा श्वास धुळीत गुदमरत आहे, आणि जबाबदार झोपलेत!
- धूळ खाणाऱ्या गावकऱ्यांची ‘आरोग्य हत्या’ - प्रशासन आणि समिती दोघंही दोषी!
- धूळप्रदूषणाचा बॉम्ब फुटला - लोणीकंदमध्ये आरोग्याचा छळ सुरूच!
- क्रशरधारक मोकाट, कमिटी बेबस - लोणीकंदला कोण वाचवणार?
- लोणीकंदची हाक: ’धूळ थांबवा, आमचं आरोग्य वाचवा!’

**जनप्रवास प्रतिनिधी**

लोणीकंद : लोणीकंद ( ता. हवेली) खाणीची धूळ किती येती, प्रदूषण विभाग काय करतो, जनसामान्यांची काळजी नाही का? असा सवाल थेट व्हाट्सअप ग्रुपवर करत गावस्तरीय धूळप्रदूषण नियंत्रण समितीतील एका सदस्यानेच आवाज उठवल्याने गावात मोठी खळबळ उडाली आहे. धूळप्रदूषण रोखण्यासाठी नेमलेलीच व्यक्ती अशी विधाने करत असल्याने या समितीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, समितीमध्ये फूट पडल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये रंगू लागली आहे.

विशेष म्हणजे, या प्रकारामागे संबंधित सदस्याला खाणमालकांकडून अपेक्षित काम न मिळाल्याचा राग आहे, अशी कुजबुज देखील सुरू आहे. गावातील नागरिक या सगळ्या घडामोडींकडे संशय नजरेने पाहत




आहेत.

गावातील अनेक क्रशर मालक शासनाने घालून दिलेले प्रदूषण नियंत्रणाचे नियम सर्रासपणे पायदळी तुडवत आहेत. रात्री अपरात्री सुरू होणाऱ्या क्रशरमुळे वातावरणात धूळ भरते आणि नागरिकांचा श्वास कोंडतो, डंपर विना ताडपत्री रस्त्यावरून भरधाव जातात, धूळप्रदूषणामुळे गावात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण त्रस्त आहेत. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, काहींना श्वसनाचे विकार जाणवू लागले आहेत. या सर्व प्रकारांकडे प्रदूषण नियंत्रण समितीचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे. हीच समिती नागरिकांचे हित जपण्याऐवजी अंतर्गत वाद आणि व्यक्तिकेंद्रित स्वार्थाच्या गोष्टीत अडकलेली दिसते. जनसामान्यांचे नाव पुढे करून काम मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप नागरिक करत आहेत.

याच दरम्यान, विना ताडपत्री डंपर थांबवून त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याचीही चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. काही वाहनचालकांनी यावर नाराजी व्यक्त केली असून, कोणी पावती न देता पैसे मागत असेल, तर ग्रामपंचायतीकडे तक्रार करा, असे आवाहनही काही समाजप्रेमी करत आहेत.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक प्रशासन, प्रदूषण नियंत्रण विभाग आणि जिल्हा अधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आरोग्य, पर्यावरण आणि कायदा-सुव्यवस्थेची लक्तरे वेशीला टांगणाऱ्या या प्रकारावर आता ठोस कारवाई होण्याची गरज निर्माण झाली आहे, धूळ थांबणार कधी? की लोणीकंदला कायमस्वरूपी प्रदूषणाची शिक्षा मिळणार? असा थेट सवाल ग्रामस्थ विचारू लागले आहेत.

# अग्रलेख : मेहुल चोक्सीच्या अटकेने एक पाऊल पुढे

पंजाब नॅशनल बँकेत कोट्यवधींचा घोटाळा करणा-या मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती भारताने केल्यानंतर बेल्जियम पोलिसांनी त्याला अटक केली. सीबीआयच्या विनंतीवरून त्याला नुकतीच अटक करण्यात आली. कोट्यवधींचा कर्ज घोटाळा करून तो पळाला होता. १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला 'वॉण्टेड' जाहीर केले होते. अर्थात त्याच्या अटकेने विजय मल्ल्या, चोक्सी, निरव मोदीसह फरार आरोपींबाबत विरोधकांकडून जोरदार टिका होत होती, त्याला प्रत्युत्तर आहे. सोबतच आर्थिक घोटाळ्यांतील भानगडबाजांवर कारवाईचा बडगा उगारण्याच्यादृष्टीने हे पहिले पाऊल म्हणता येईल. अर्थात त्याला भारतात आणल्यानंतरच.

मेहुल चोक्सीवर नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या कायद्यानुसार फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केल्यास चोक्सीच्या जप्त केलेल्या सा-या संपत्तीवर टाच आणण्याची प्रक्रिया तपास यंत्रणेने सुरू केली आहे. मात्र, चोक्सीने प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देऊन तूर्तास भारतात परतणे शक्य नाही असे त्याच्या याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे चोक्सी भारतात येण्याची प्रक्रिया लांबू शकते. दरम्यान बेल्जियम पोलिसांनी चोक्सीला अटक केल्याने आता त्याच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाल्याचे म्हटले जात आहे. तो कर्करोजाने आजारी असून, बेल्जियम पोलिसांनी एका खासगी रुग्णालयातून त्याला अटक केली. पीएनबी घोटाळ्यातील मुख्य आरोपी नीरव मोदी याचा चोक्सी हा मामा आहे. या मामा-भाच्यानी पंजाब नॅशनल बँकेच्या काही उच्चपदस्थ अधिका-यांशी संगनमत करून बँकेची बनावट हमीपत्रे (लेटर ऑफ अंडरटेकिंग) तयार केली. या बनावट हमीपत्रांच्या सहाय्याने त्यांनी परदेशात बँकांकडून मोठ्या रकमेची कर्जे मिळवली. तसेच परदेशात क्रेडिट सुविधा मिळवून बँकेची १४ हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ६५ वर्षीय चोक्सी हा भारतातील गीतांजली जेम्स लि. या कंपनीचा मालक आहे. त्याच्या हिरेजडित दागदागिन्यांची निर्मिती करणारा उद्योग २०१८ मध्ये पीएनबी घोटाळा उघड झाल्यानंतर बंद पडला. त्याच वर्षी चोक्सी भारताबाहेर फरार झाला. सुरुवातीला त्याने अँटिग्वा अँड बर्मुडा या देशाचे नागरिकत्व मिळवले. गतवर्षी तो बेल्जियममध्ये वास्तव्यास आला. भारतीय तपास यंत्रणांना गेली सात वर्षे गुंगारा देणा-या चोक्सीला अटक होण्याची ही पहिलीच वेळ नाही.

या आधी मे २०२१ मध्ये त्याला डोमिनिका देशात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याच्या गुन्ह्यात अटक झाली होती. तेव्हादेखील भारतीय तपास यंत्रणांनी त्याच्या प्रत्यार्पणासाठी प्रयत्न केले होते. मात्र, डोमिनिकाच्या न्यायालयाने त्याला वैद्यकीय उपचारासाठी पुन्हा अँन्टिग्वाला जाण्याची परवानगी दिल्याने प्रत्यार्पणाचे प्रयत्न अपयशी ठरले होते.

त्यानंतर ईडीने चोक्सीशी संबंधित २ हजार ५०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. न्यायालयाने या मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी दिली आहे. चोक्सीचे येणे ही काँग्रेससाठी डोकेदुखी ठरेल असे म्हटले जात आहे. कारण चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी भाजपवर तोफा डागल्या होत्या. केंद्रात भाजपचे सरकार होते. भाजपने त्याला पळून जाण्यासाठी मदत केली. चोक्सी भारतातून पळाल्यानंतर काँग्रेसने मोठा गदारोळ केला होता. 'सगळेच मोदी चोर असतात' असे विधान करण्यापर्यंत मजल गेली होती.

भारताने जागतिक महाशक्ती अमेरिकेतून दहशतवादी तहव्वूर राणाला भारतात आणले. त्या तुलनेत चोक्सीला त्याला बेल्जियममध्ये अटक झाल्याने भारतात आणणे सोपे आहे. चोक्सीचे काँग्रेस पक्षाशी संबंध असल्याने भाजप सरकार त्याला टार्गेट करीत आहे असा आरोप चोक्सीच्या वकिलांनी केला होता.

गीतांजली जेम्स या चोक्सीच्या कंपनीने राजीव गांधी फाऊंडेशनला देणग्या दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. एका फसवणूक प्रकरणात २०१५ मध्ये मेहुल चोक्सीची बाजू मांडणारे वकील चंद्रमौली यांना काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिल्याचा आरोप भाजपने केला होता. चोक्सीशी संबंध असल्याचे आरोप काँग्रेस नेते पी. चिदम्बरम, अभिषेक मनु सिंघवी यांच्यावरही झाले आहेत. दरम्यान, किंगफिशरचे मालक विजय मल्ल्या, चोक्सी, नीरव मोदी यांच्या ब-याच मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.

दरम्यान चोक्सीची कंपनी गीतांजली जेम्स ही ईडीने दाखल केलेल्या अनेक आरोपपत्रांमध्ये समाविष्ट आहे. सीबीआयने चोक्सी, नीरव मोदी व बँक अधिका-यांसह इतरांवर फसवणूक, गुन्हेगारी कट आणि भ्रष्टाचारासंबंधी खटले दाखल केले आहेत.

चोक्सीला भारतात आणल्यानंतर त्याचे कोणाकोणाशी संबंध आहेत ते स्पष्ट होईल. बडे उद्योगपती, व्यावसायिक यांनी देशातील बँकांकडून प्रचंड मोठ्या रकमेचे कर्ज घ्यायचे, नंतर त्या कर्जाची परतफेड करायची नाही आणि देशाबाहेर पलायन करून आरामात आलिशान आयुष्य जगायचं असा जो सिलसिला सुरू होता तो आता खतम होण्याच्या मार्गावर आहे. विजय माल्ल्या, मेहुल चोक्सी, नीरव मोदी, ललित मोदी, नितीन संदेसरा या लफडेबाजांच्या मुसक्या बांधून त्यांना भारतात आणले पाहिजे. त्यांनी केलेल्या कर्माचे फळ त्यांना दिलेच पाहिजे.

# तेव्हा मी पायलेट; आज को-पायलेट

## राजकारण

### एकनाथ शिंदे यांची मिश्किल टोलेबाजी

अलिकडे पायलटची सीट बदलली तरी विकासाचं विमान हे कायम तेच आहे आणि आम्ही त्याच गतीने समोर जात आहे. असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर टीका केली आहे. अमरावती येथे नूतन विमानतळाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदींसह मान्यवर उपस्थित होते.

शिंदे म्हणाले, राज्यात २०१४ ते २०१९ दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या काळात अनेक विकास कामे झाली. मात्र मधल्या काळात अचानक आलेल्या सरकारने पुन्हा काम बंद करण्याचे काम झालं. पण २०२२ साली तुमच्या मनातलं महायुतीचं सरकार आलं, तेव्हा पुन्हा या विकासकामांना गती मिळाली. त्यामुळे अतिशय कमी वेळात आपण अमरावती येथील विमानतळाचे काम खऱ्या अर्थाने सुरू करू शकलो. महायुतीचे सरकार येण्यापूर्वी आपण पाहिलं की अनेक महत्त्वपूर्ण योजना बंद पडल्या होत्या, विकास काम ठप्प झालं होतं आणि विकास आणि कल्याणकारी योजणांचं टेक ऑफ झालं. मात्र त्यानंतर विमानाचा पायलट मी होतो आणि को- पायलट देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा होते. मात्र आता देवेंद्रजी पायलट आहे आणि आम्ही दोघे को पायालट आहोत.

ते म्हणाले, पायलटची सीट बदलली तरी विकासाचा विमान हे कायम तेच आहे आणि आम्ही त्याच गतीने समोर जात आहोत.



कारण आमचे इंजिन तेच आहे. असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मुंबई समृद्धी महामार्गचे लोकार्पण होतं असताना अनेकांनी या विकास कामाला विरोध केला. त्यावेळी मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस होते. तर मी त्या विभागाचा मंत्री म्हणून काम पाहिलं. अनेकांनी विकास विरोधी भूमिका घेतली. मात्र आम्ही ते काम करून हा महामार्ग विकासाचा महामार्ग असल्याचे सिद्ध करून दाखवलं.

**त्यांना केवळ अडचणीचा पाढा पाठ**

समृद्धी महामार्गाच्या वेळी देवेंद्र फडणवीसांची नेतृत्वात मी रस्त्यावर उतरून काम केलं आणि काम करून दखवले. मुंबईतील कोस्टल रोड असेल किंवा अटल सेतू असेल, नव्या मुंबईतील विमानतळ असेल असे अनेक विकासकामे आम्ही गेल्या अडीच वर्ष्याचा काळात मार्गी लावले आहे. समृद्धी महामार्गात काही लोकांनी आळमुठी भूमिका घेतली. आधी चे लोक सत्तेत होते त्यांना केवळ अडचणीचा पाढा पाठ होता, विकासाचा पाढा त्यांना पाठ नव्हता. विरोधक अफवा पसरवत आहे, पण आम्ही लाडकी बहीण योजना बंद करणार नाही. टप्याटप्यामध्ये सर्व योजना सुरू करू. पेपर मिस्टिकवालं आमचं सरकार नाही. हे डबल इंजिन सरकार आहे. गेल्या १० वर्षात ८६ विमानतळ झाली असून आगामी काळात मोदीजींच्या मार्गदर्शनात अजून काम आम्हाला करता येणार आहे. आम्हाला पालघर येथे ही नवं विमानातळ करत असल्याची घोषणा ही एकनाथ शिंदे यांनी यावेळी केली.

**वायुवेगानं नसलं तरी वायूयानाने अमरावतीला : फडणवीस**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपण असं ऐकलं आहे की रुक्मिणीचं हरण करताना अमरावतीमधून श्रीकृष्णाने वायुवेगाने ते हरण केलं होतं. आता वायुवेग तर पाहण्यास मिळणार नाही. पण अमरावतीत वायुयानाने येता येईल आणि जाता येईल ही व्यवस्था मात्र माननीय मोदींच्या सरकारने केली त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. अर्थात अमरावतीचं माझ्यावर मोठं कर्ज आहे. कारण माझी आई अमरावतीची असून, मला अमरावतीला आजोळी येताना आता आगीन गाडीनं नव्हे तर विमानानं येता येईल.

## अंतरंग

### या बाबूंना धडा कोण शिकविणार?

गेल्या काही वर्षांपासून देशाच्या अनेक भागांमध्ये ड्रग्जसह अंमली पदार्थ सापडण्याचे प्रकार वाढत आहेत. अलिकडेच गुजरातमध्ये १८०० कोटींचे ३०० किलो ड्रग जप्त करण्यात आले. गुजरात दहशतवादी विरोधी पथक व तटरक्षक दलाने संयुक्तपणे ही मोहीम राबवली. गुजरात जवळच्या अरबी समुद्रात तटरक्षक दलाच्या बोटी गस्त घालत होत्या. त्याचवेळी त्यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे एका संशयास्पद बोटीचा पाठलाग सुरू केला. त्यावेळी त्या बोटीवरच्या लोकांनी हे ड्रग समुद्रात फेकायला सुरुवात केली. त्याचवेळी ती बोट तटरक्षक दलाने जप्त केली. आणि त्यात असलेले १८०० कोटींचे ड्रगही जप्त केले. विशेषतः गेल्या वर्षभरात गुजरातचा समुद्रकिनारा हा ड्रग तस्करीने गाजतो आहे. २०२४ ला ऑक्टोबर महिन्यात ५ हजार कोटींचे कोकेन जप्त केले गेले होते. पाच जणांना अटकही केली होती. त्यानंतर केवळ महिन्याभरातच म्हणजे नोव्हेंबरमध्ये पोरबंदर किनाऱ्यावर ८०० किलो मेथाफेटामाईन नावाचे मादक पदार्थ पकडले गेले. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याची किंमत जवळपास साडेतीन हजार कोटी असल्याचे सांगितले गेले होते. त्याचवेळी दिल्लीतही अशीच ड्रगची तस्करी करणाऱ्यांना पकडले गेले. अंकलेश्वर भागामध्ये सापडलेला हा ड्रगचा साठा आणि दिल्लीत सापडलेले मादक पदार्थ या दोघांची किंमत तेरा हजार कोटी असल्याचे सांगितले गेले होते. जानेवारी २५ मध्येसुद्धा असाच १ हजार कोटींचा ड्रग साठा सापडला होता. म्हणजे सरासरी दोन ते तीन महिन्यांमध्ये गुजरातच्या सागरी किनाऱ्यावर ड्रग पकडले जात आहेत. विशेषतः पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश या भागातून केली जाणारी ड्रगची तस्करी म्हणजे हा किनारा ड्रग माफियांना अधिक सुरक्षित वाटतो आहे हे सिद्ध होते. अर्थातच आतापर्यंत या तस्करीकडे दुर्लक्ष केले गेले. म्हणूनच याच मार्गाने सुरक्षितपणे ड्रग भारतात आणण्याचा खेळ केला जातो, यांचा केवळ ड्रग माफिया म्हणून उल्लेख करून चालणार नाही. या सगळ्यांची आंतरराष्ट्रीय कनेक्शन्स असतात आणि ते एकमेकांना केवळ ड्रगपुरती मदत करत नाहीत तर त्यामागचे इतरही धंदे चालू असतात. अगदी गेल्या दोन तीन वर्षात प्रचंड प्रमाणात ड्रग्ज सापडले आहेत. आणि त्या सगळ्यांचा मूळ स्त्रोत लक्षात घेतला तर काही विशिष्ट देशांमधूनच त्याचा पुरवठा होतो. भारतातल्या काही विशिष्ट प्रांतांमधल्याच लोकांना हाताशी धरून ड्रगचे जाळे विस्तारले जाते. आता हे संकट देशाच्या ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहोचलेले आहे. अगदी शाळकरी मुलंदेखील त्यांचे टार्गेट आहे. चॉकलेट गोळ्यांच्या नावाखाली लावले जाणारे हे व्यसन येणाऱ्या पिढीला बरबाद करण्याचे मोठे कारस्थान ठरते. या माफियांना ड्रग व्यापारातून भलेही गडगंज पैसा मिळत असेल, परंतु देशाच्या खऱ्या संपत्तीचा विचार केला तर इथल्या युवा पिढीचे खच्चीकरण करणे आणि कुटुंब व्यवस्थाही उद्ध्वस्त करणे असे खेळ त्यातून सुरू झालेले आहेत. म्हणूनच आज दहशवादी कारवाया जरी कमी झाल्या असत्या तरी त्याची जागा आता या ड्रग्ज माफियांनी घेतल्याचे दिसते. म्हणजे अतिरेक्यांऐवजी आता या ड्रग माफियांनी देशाच्या खेड्यापाड्यापर्यंत आपली दहशतच निर्माण केलेली आहे असेच म्हणावे लागते. दहशतवादी हल्ले घडवून इथे अस्थिरता निर्माण करायची. आणि आता ड्रगची तस्करी आणि व्यापार करून आर्थिक अस्थिरता आणि समाजव्यवस्थेलाच सुरूंग लावण्याचा कट केला जातो आहे. ज्या वेगाने आणि ज्या प्रमाणात हा ड्रगचा व्यापार फोफावतो आहे ते पाहिल्यावर दहशतवादी संघटनांनीच आता वेगळा फंडा वापरून भारतात असे छुपे आक्रमण चालवलेले आहे. दहशतवादी हल्ल्यात हिंसाचार घडवणे, लोकांचे बळी घेणे हा प्रकार घडतो. ड्रगमुळे पिढीच्या पिढी कमकुवत व नेस्तनाबूत केली जाते. ४० हजार कोटींचे ड्रग सापडतात म्हणजेच समांतर चलन व्यवस्थाच अंमलात आणली जाते. त्यासाठी केवळ ड्रगचा नायनाटपुरते मर्यादित न राहता पोशिंद्यापर्यंत पोहोचले पाहिजे. आज अनेक राज्यांमध्ये ड्रग शोधून काढण्याकरीता अंमली पदार्थविरोधी पोलीस पथक कार्यरत असते. परंतु देशाच्या सीमावर्ती भागामध्ये ज्या प्रमाणात ड्रग्जचा धुमाकूळ दिसतो आहे त्या विरोधात दहशतवादविरोधी पथक, तटरक्षक दल, सीमासुरक्षा दल यांनाच संयुक्तपणे कारवाई करावी लागली. याचा अर्थ यात सहभागी असलेले लोक दहशतवादीच आहेत. त्यांना वेगवेगळ्या मार्गातून आपले अस्तित्व निर्माण करायचे आहेच. शिवाय देशाची समाजव्यवस्था ही पोखरून काढायची आहे. म्हणूनच केंद्र सरकारने ड्रग तस्करीत सापडणाऱ्यांवर थेट दहशतवादविरोधी कायद्याचाच वापर केला पाहिजे. त्याला केवळ तस्करी किंवा मादक पदार्थाचा व्यापार वापरतेच मर्यादित न ठेवता तो देशात दहशत निर्माण करण्याचा तितकाच घातक प्रकार असल्याचे अधिकृतपणे जाहीर केले पाहिजे. मुंबईसारख्या आर्थिक राजधानीत या ड्रग दहशतवादाने आपली पाळेमुळे चांगलीच रोवली आहेत. तिथल्या बॉलिवूड इंडस्ट्री, हायफाय सोसायटीज आणि विशेषतः पश्चिम उपनगरातल्या प्रतिष्ठित शिक्षण संस्था या लोकांनी टार्गेट केल्या आहेत. याचा अर्थ नियोजनपूर्वक पण देशाच्या सर्व भागांत आणि महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने त्याचा शिरकाव केला जातो आहे.

**– सुहास पाटील**

## पंचांग

विक्रम संवत्– २०८१ चैत्र शके संवत्– १९४७ संवत्सर – विश्वावसूनाम अयन– उत्तराणायण मास– चैत्र ऋतु– सौर वसंत कृष्ण पक्ष तिथि : चतुर्थी १५:२३:४१ नक्षत्र : ज्येष्ठा (अहोरात्र) योग:वारीयन २४:४९:५५+करण:बालव १५:२३:४१करण:कौलव २८:१८:५४+सूर्य:मेष चन्द्र:वृश्चिक हिजरी सन् – १४४६ मुस्लिम मास –शव्वाल तारीख – १८ विशेष

## राशी भविष्य...

**मेष** – आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

**वृषभ** – आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**मिथून** – महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

**कर्क** – उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल. जोखमीची कामे शक्यतो आज करू नका.

**सिंह** – आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**कन्या** – जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील.

**तूळ** – आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुध्दीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**वृश्चिक** – केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**धनू** – आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मकर** – चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या. मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**कुंभ** – जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मीन** – मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नोकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

## पारावरचा फड

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ'वर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'स्नेहभोजन' पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या ऋणानुबंधांना उजाळा देऊन गेलं. अर्थात महायुतीत असूनही एकनाथ शिंदे यांची नाही म्हटले तरी नाराजी, कोंडमारा आणि त्यातून पक्षाला बळकट ठेवण्याच्यादृष्टीने या दोघांच्या भेटीला राजकीय कंगोरे स्वाभाविकच आहेत. त्यातून उलट-सुलट चर्चा होणं, आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्यादृष्टीने एकमेका साहाय्य करू किंवा महाकयुतीत राज ठाकरेंना घेण्याची चर्चा होणारच. पण राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यात महायुतीचा सत्तेचा बाजार आणि एकूणच राजकारणातील निच्चांकी पातळीचे खेळ याबाबत तोफ डागली होती. यात शिंदेंनाही खडे बोल सुनावले होते. असे असताना पुन्हा शिंदेंशी जवळीक ही राज ठाकरेंच्या विश्वासार्हता आणि राजकीय वाटचालीबाबत संभ्रम निर्माण करणारी आहे. यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**बाबूराव :** आरं ह्या राजसायबाचं सारकं भूमिका बदलनं आन् शिंदे-फडनवीसास्नी नावं ठेवून घरी शिवतीरथावं बोलावून पाहुनचार हा ईशय 'कहना क्या चाहते हो'सारकाच हाय.

**पांडूनाना :** खराय तुजं. राजसायबाचं कुनास्नी कायच कळत न्हाय. तसं न्हवं आशानं त्यांची भूमिका म्हजी कालचं काय आटवत न्हाय अशा गजनीसारकी म्हनाय हावी का?

**बाबूराव :** तसं काय नसतं रं. आरं शिंदेसायबाचं आन् राजसायबाचं जुनं शिवशेना आन् बाळासायब परेम हायच की? आन् दोघास्नी बी सत्तावाल्या भाजपला डिवचायसाटी ह्यो खेळ करायच लागतुया.

**पांडूनाना :** कसला ख्योळ आन् कसलं काय? राजसायबानं नुकतंच पाडवा मेळाव्यात समद्याचीच काडली हुती. लोकानी ह्यानास्नी 'जोड्यानं' जाब ईचारावा आसं म्हटलं हुतं. ह्यापुडं म्हायुतीच्या कंच्याच सत्तेचं लालुच आन् संगट नगं म्हनालं. मग पुन्यांदा शिंदेसायबाला घिऊन घरात जेवाय बसत्यात.

**बाबूराव :** खराय तुजं, आता राजकारनी टेबलावं जेवाय बसली तर ते काय भजन आन् कौटुंबिक गप्पा मारनार हायती का? त्येंचं राजकारनच व्हायाचं.

**पांडूनाना :** पन कार्यकरत्यांनी काय समजायचं.

**बाबूराव :** कसलं काय समजायचं? जे हायती ते राजसायब म्हंत्याल ती पूरवदिशा म्हंनारं कार्यकरतं हायती.

**पांडूनाना :** व्हय, पन आसलं कसलं राजकारन? नुकतंच मनशे आन् उबाठा सेनेचं ह्याच भाजप आन् म्हायुतीच्या भूमिकेईरोदात सारकी आंदोलनं हुती. ते ईचार जुळत हुते. मग काल ती वाट आन् आज येगळी.

**बाबूराव :** आरं म्हनून तर पवारसायब म्हंत्यात, राज ठाकरेंचं भाषन म्हजी नुसती करमनूक आन् गरदीपुरती. त्ये गांभीर्यानं घ्यायचं नसतं.

**– अमृत चौगुले**

## उपदेश कथा

**मान-अपमानाचा अभ्यास**

परमाचार्यांचा एक शिष्य म्हैसूरच्या न्यायालयामध्ये मुख्य न्यायाधीश होता. गरिबीतून कष्ट करून जीवनात यशस्वी झालेला तो माणूस शंकराचा भक्त होता. ओम् नम: शिवाय या मंत्राचा पाच हजार जप केल्याशिवाय तो अन्नग्रहण करीत नसे. त्याला ईश्वरदर्शनाची खरी ओढ होती. निवृत्त झाल्यावर तो आपल्या गुरूकडे गेला आणि आता मला ईश्वरदर्शनाचा मार्ग सांगा असे म्हणाला. गुरू म्हणाले, मी मोठा न्यायाधीश होतो हे आधी विसरा. गुरू आज्ञेप्रमाणे तो न्यायाधीश घर सोडून द्वारकेला गेला. तेथे श्रीकृष्णाच्या मंदिरासमोर तो भिकारी लोकांच्या रांगेमध्ये बसून भीक मागू लागला. म्हैसूर सरकारचे गोपाळस्वामी नावाचे एक शिक्षणाधिकारी मे महिन्यात द्वारकेला गेले. श्रीकृष्णाच्या दर्शनाला जाताना त्यांनी या भिकाऱ्याला पाहिले. गोपाळस्वामी त्या जज्जाच्या मागे गेले. जज्ज आपल्या खोलीचे कुलूप काढताच गोपाळस्वामींनी ओळखले. नमस्कार करून त्यांना विचारले, हे असे का? जज्ज म्हणाला, मग ते साधले का असे विचारल्यावर जज्ज मी मोठा जज्ज होतो हे मी खरेच विसरलो. पण लोकांजवळ भीक मागताना अजून मला खऱ्या भिकाऱ्याची लाचारी येत नाही. मला पेन्शन आहे हे विसरणे कठीण जाते.

## दिनविशेष...

**आंतरराष्ट्रीय**

१७११ – चार्लेस पाचवा हब्सबर्ग ऑस्ट्रीयाचा राजेपदी.

१८७५ – सर नेवीली केंबरलेन यांनी 'स्नुकर' विकसित केले.

१९४६ – फ्रान्सकडून सिरियाला स्वातंत्र्य घोषित करण्यात आले.

१९५६ – बलगारियाचे पंतप्रधान टीचरवेनको यांनी राजीनामा दिला.

१९७१ – शेख मुजीबूर रेहमान यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यांना देशद्रोहाच्या आरोपावरून अटक करून पाकिस्तानात रवाना करण्यात आले.

१९७५ – रॉबर्ट मुगाबे झांबियाक्षे पंतप्रधान बनले.

२००६ – पश्चिम कोलंबियात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दरड कोसळून २९ जण ठार झाले.

२००७ – पाकिस्तानमध्ये आपल्या १३ नातेवाईकांची हत्या करणाऱ्या चार भावांना फाशी देण्यात आली.

**राष्ट्रीय**

१९८३ – भारताच्या रोहिणी-डी-३ उपग'हाचे यशस्वी प्रक्षेपण.

२००२ – स्वामी सच्चिदानंद यांना संयुक्त राष्ट्रसंघाचे युथांट शांततापदक.

२००६ – आंध्र प्रदेशात वीज कोसळल्याने १६ जण ठार झाले.

२००७ – जम्मूत बस दरीत कोसळल्याने १३ जण ठार झाले.

# एक होता कॉलीन ब्लँड

डॉ उदय ह. मुळगुंद
(महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई)

एखाद्याची फलंदाजी पाहायला जगभरातील कित्येक क्रीडांगणावर प्रेक्षकांची गर्दी होत असते जे प्रतिभावंत खेळाडू असतात त्यांचा एखादा तरी फटका पाहायला मिळावा म्हणून रसिक आतुरतेने वाट पाहत असतात. फ्रँक वॉरेल, डॉन ब्रॅडमन, जॅक हॉब्ज, हनिफ महंमद, डग वाल्टर्स, आशियाचा ब्रॅडमन झहीर अब्बास, हे ते फलंदाज होते. आपल्या देशातील विश्वनाथ, सुनील गावस्कर, व सध्या कीर्ती शिखरावर असलेला विराट कोहली यांचा समावेश वरील दिग्गजांमध्ये करता येईल

गोलंदाजीचेही असेच आहे दिग्गज अशा लारवूड, लिंडवॉल, हॉल, गिब्ज, लिली, इम्रान अशा गोलंदाजांचा खेळ पहाण्यास क्रीडा रसिक सामने पहात.

**क्षेत्ररक्षणाचे चाहते**

क्रिकेटच्या इतिहासात असाच एक खेळाडू होऊन गेला केवळ त्याचे क्षेत्ररक्षण पहायला मिळावे याकरिता प्रेक्षकांची गर्दी व्हायची. तो होता कॉलीन ब्लँड. कॉलीन ब्लँड आउटफिल्डमध्येच क्षेत्ररक्षण करीत असे. कॉलीन ब्लँड हा क्षेत्ररक्षणातला ब्रॅडमन होता असं म्हटलं तरी ते अतिशयोक्तीपूर्ण म्हणता येत नाही.

कॉलिंग ब्लँडच्या क्षेत्ररक्षणाची चर्चा सर्व जगभर असायची

कॉलिन काउड्रे कप्तान असलेल्या काउंटी संघाविरुद्ध दक्षिण आफ्रिकेचा सामना होता. कॉलिन काउड्रे दौऱ्यावर आलेल्या दक्षिण आफ्रिका संघाच्या ड्रेसिंगरूम जाऊन त्याने विनंती केली मैदानावर खूप गर्दी झाली आहे प्रेक्षकांचे मनोरंजन होईल असे काही कॉलिंग ब्लँड करून दाखवेल का ?

दक्षिण आफ्रिकेचा मधल्या फळीचा फलंदाज कॉलीन ब्लँड सामान्यत: कमी प्रोफाइलमध्ये राहणे पसंत करत असे. साक्षात कॉलीन काउड्रेने विनंती करतात त्याने ते मान्य केले.कुठूनतरी मैदानात स्टंपचा एक संच तयार झाला. एक चेंडू १५ वेळा, विविध वेगाने, विविध कोनांवर, जमिनीवर टाकला गेला आणि ब्लँड एकटाच क्षेत्ररक्षक म्हणून गस्त

घालत होता. तो प्रत्येक वेळी २० ते ३० यार्ड अंतरावरून धावत होता. १५ पैकी १२ वेळा, चेंडू एकच स्टंप दिसत असताना अचूकपणे आदळला. मैदानातील प्रेक्षकांनी उभे राहून कॉलीनला सलाम केला. त्यानंतर एका आठवड्यानंतर झालेला १९६५ मधील लॉर्डस वरचा तो कसोटी सामना केन बॅरिंग्टन आयुष्यभर विसरू शकला नाही. सामन्याचा तो तिसरा दिवस होता .दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावातील २८० धावांच्या उत्तरात इंग्लंडने ४ बाद २४० धावा केल्या होत्या आणि सामना जिंकून देणारी आघाडी घेतली होती. केन बॅरिंग्टन ९१ धावांवर खेळत होता, तो त्यादिवशी चांगल्याच फॉर्ममध्ये होता , तर दुसऱ्या टोकाला चष्मा घातलेला कर्णधार माइक स्मिथ होता. गोलंदाजांनी टाकलेल्या चेंडू स्किन बॅरिंग्टन त्यांनी रिकाम्या स्क्वेअर लेग कडे एक धाव घेण्यासाठी ढकलला. आता तो क्षण आला ज्याने मालिकेचे नशीब



बदलले. बॅरिंग्टनने रिकाम्या स्क्वेअर लेगकडे सहज एक धाव घेण्याचा प्रयत्न केला. स्मिथ आधीच स्ट्रायकरच्या टोकाकडे वेगाने जात होता. इतक्यात मिड-विकेटवरून, कॉलिन ब्लँड चपळाईने लेग अंपायरकडे धावला व एक अफलातून एका शानदार हालचालीत शरीराचा एकही भाग जमिनीला स्पर्श न करता चेंडू अचूकपणे फेकला, व अगदी आडव्या दिशेने प्रवास करत, नॉन-स्ट्रायकरच्या टोकावरील स्टंपवर आदळला. बॅरिंग्टन त्याच्या क्रीजपासून खूप तो दूर मागे होता. बॅरिंग्टन तंबूत परतला होता. गोंधळलेल्या स्मिथने त्याच धावसंख्येवर झेल देऊन बाद झाला. अशा प्रकारे डावात मोठी आघाडी मिळवण्याच्या आशा काही क्षणातच धुळीस मिळाल्या.

दुसऱ्या दिवशी रविवार होता रविवार हा विश्रांतीचा दिवस होता त्या काळात एक दिवस विश्रांतीचा असायचा..

सोमवारी जिम पार्क्स आणि फ्रेड टिटमस यांनी इंग्लंडची धावसंख्या दक्षिण आफ्रिकेच्या धावसंख्येपेक्षा थोडी पुढे नेली.६ बाद २९४ धावांवर असताना पार्क्सने लेगकडे चेंडू मारला आणि लॉर्डसच्या मैदानात पुन्हा एकदा जल्लोष झाला. ब्लँडने पुन्हा एकदा जोरदार झेप घेतली, चेंडूवर झेपावला आणि तीच ॲक्शन केली – गोलंदाजाच्या टोकाकडे आणि स्क्वेअर-लेगकडे पूर्ण थ्रॉटल धावत – आणि स्टंप पुन्हा एकदा पार्क्सच्या पायांच्या मध्ये आदळले. इंग्लंड संघ गडगडला. दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात ७० धावांची महत्त्वाची खेळी करत कसोटी अनिर्णित करण्यासाठी झुंज दिली.

सामन्यानंतर बॅरिंग्टनची प्रतिक्रिया होती ॐमला माहित होतं की कॉलिन महान आहे पण तो मी विचार करत होतो त्यापेक्षाही महान आहे.

(क्रमश:)

# प्रशासन व जनतेतील समन्वयासाठीच जनता दरबार : आमदार काशिनाथ दाते

## पारनेरमध्ये आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वात जनता दरबाराचे यशस्वी आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पारनेर शहरातील इंदिरा भवन येथे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. या जनता दरबाराला शेकडो नागरिकांनी आपल्या विविध समस्या घेऊन हजेरी लावली. नागरिकांच्या प्रश्नांना ऐकून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करण्याचे आश्वासन आमदार दाते यांनी दिले. दरमहा एक दिवस जनता दरबाराचे आयोजन करून नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या माध्यमातून सोडवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.या जनता दरबारात नागरिकांनी महसूल विभाग, पुरवठा विभाग, भूजमापन विभाग, पंचायत समिती अंतर्गत विविध विभागांशी संबंधित तक्रारी मांडल्या. यावेळी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तक्रारींची दखल घेऊन अनेक प्रश्न तात्काळ मार्गी लावले. तहसीलदार गायत्री सौंदाणे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दयानंद पवार, पारनेर पोलीस निरीक्षक समीर बावरकर, सुपा पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तत्परता दाखवली.जनता दरबारात महायुतीच्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळ चालू ठेवण्यासाठी भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटिल शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, ज्येष्ठ नेते वसंत चेडे, जिल्हा बँक संचालक प्रशांत दादा गायकवाड, राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, युवक अध्यक्षा अपर्णा खामकर, संदीप कपाळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि प्रशासनाशी समन्वय साधण्याचे काम केले.आमदार काशिनाथ दाते यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांवर झालेला अन्याय दूर करण्याचा निर्धार व्यक्त केला. नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून निराकरण करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक महिन्याला जनता दरबार आयोजित करून आम्ही जनतेच्या जवळ राहू, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी विश्वास निर्माण झाला असून, अनेकांनी आमदार दाते यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले.हा जनता दरबार यशस्वी ठरला असून, येत्या काळातही अशा उपक्रमांद्वारे नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार दाते आणि महायुतीचे कार्यकर्ते कटिबद्ध असल्याचे दिसून आले. या दरबारामुळे पारनेर तालुक्यातील नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.



> नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने निराकरण करणे हा जनता दरबाराचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येक महिन्याला असा दरबार आयोजित करून आम्ही जनतेच्या जवळ राहू आणि त्यांच्यावर झालेला कोणताही अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न करू. आज शेकडो नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या, त्यापैकी अनेक प्रश्न मार्गी लावले असून, उर्वरित समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधला जाईल.
>
> – काशिनाथ दाते (आमदार)

## संक्षीप्त वृत्त

### हिमनद्या वाचवण्यासाठी जागतिक वाढते तापमान रोखण्याचे आवाहन




■ जनप्रवास : प्रतिनिधी

पुणे : जलचक्रामध्ये ग्लेसिअरचे (हिमनदी) फार मोठे काम आहे. त्यात पाण्याचा साठा बर्फाच्या रुपामध्ये ठेवला जातो. हिमनद्या सजीवासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत – त्यांचे वितळणारे पाणी पिण्याचे पाणी, शेती, उद्योग, स्वच्छ ऊर्जा उत्पादन आणि निरोगी परिसंस्थांसाठी आवश्यक आहे. वेगाने वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे पाण्याच्या प्रवाहात अनिश्चितता निर्माण होत आहे, ज्याचा लोकांवर आणि पृथ्वीवर खोलवर परिणाम होत आहे..ग्लेसिअर जर वितळले तर समुद्रातील पाण्याची पातळी वाढून तेथिल शहरे पाण्याखाली जातील. आपल्या कडे ग्लेसिअरला धार्मिक महत्व आहे. कैलास पर्वत व मानस सरोवर ,शिव भगवान कैलासावर विराजित आहेत अशी कल्पना आहे.जागतिक तापमान असेच वाढत राहिल्यास हिमालय वितळला तर गंगेमध्ये येणारे पाणी असणार नाही त्यामुळे पुढील महा कुंभ होण्याबाबत शंका निर्माण होते. हे सर्व जागतिक तापमान वाढीमुळे होत आहे. हे थांबवण्यासाठी हरित वायूची निर्मिती व उत्सर्जन कमी करणे अत्यावश्यक आहे. उर्जेचा कार्यक्षम वापरव कपात सौर व पावन उर्जेचा अधिक वापर, वर्तुळाकार अर्थव्यवस्था, शून्य कार्बन इत्यादी संकल्पना अमलात आणायला हव्यात. सर्वांनी दैनंदिन जीवनामध्ये पाणी उर्जा व इतर संसाधनाच कमीत कमी वापर करावा असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक व मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष रो आर.वी.सराफ यांनी सर्वांना केले. ते जागतिक जलदिनानिमित्त इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स येथे झालेल्या कार्यक्रमाच्या वेळी बोलत होते.

### गोरक्षनाथ भाकरे यांचे निधन



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : झारेकरगल्ली येथील रहिवासी कै.गोरक्षनाथ गुलाबराव भाकरे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे.मृत्युसमयी त्यांचे वय ४९ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले,भाऊ,सुना,नातवंडे,पुतणे,असा मोठा परिवार आहे.

### मुकुंद नगर येथे हेल्थ केअर क्लिनिक दवाखान्याचे उद्घाटन समारंभ



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नगर शहरातील मुकुंद नगर येथे रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी दुपारी तीन ते आठ या वेळेत करण्यात आले यावेळी आलेल्या रुग्णांची मोफत बॉडी चेक अप बी पी आणि शुगर तपासणी करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आरिफ शेख जिल्हाध्यक्ष भूमी अभिलेख कास्ट कर्मचारी कल्याण महासंघ महाराष्ट्र राज्य हे उपस्थित होते आणि डॉक्टर तनवीर देशमुख आणि डॉक्टर सौ आरती डहाळे मॅडम यांनी शिबिरात आलेल्या रुग्णांची खूप योग्य प्रकारे तपासणी केली आणि यावेळी दोन्ही डॉक्टरांचे सत्कार फईम शेख ताज मेडिकल यांनी देशमुख डॉक्टर यांचे सत्कार केले यावेळी नफीसा शेख डॉक्टर आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### सिद्धेश्वरवाडी ग्रामपंचायत उपसरपंचपदी इंदुबाई चत्तर यांची बिनविरोध निवड



जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : पारनेर तालुक्यातील सिद्धेश्वरवाडी येथील ग्रामपंचायतची उपसरपंच पदाची निवडणूक सोमवार दि.१५ रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सिद्धेश्वरवाडीच्या सरपंच शितल संतोष कावरे यांच्या अध्यक्षतेखाली शांततेत पार पडली. या निवड प्रक्रियेत इंदुबाई चत्तर यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपसरपंचपदी निवड झाल्याचे सरपंच शितल कावरे यांनी जाहीर केले. या वेळी संतोष राधाकृष्ण कावरे, डॉ. आप्पासाहेब नरोडे, माजी सरपंच गोटीराम कावरे, माजी उपसरपंच अण्णासाहेब चत्तर, विलास कावरे, धोंडीभाऊ कावरे, सुदाम चत्तर, किसन चत्तर, पप्पू नखादे, रामदास चत्तर, संभाजी कापरे, तसेच ग्रामपंचायत सदस्य दगडू कावरे, वैशाली नखादे, स्वप्नाली ठुबे, ग्रामसेवक भालेकर व तलाठी पवार उपस्थित होते. गावच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सरपंच व नवनिर्वाचित उपसरपंच यांनी सांगितले.

### एअरटेल ब्लिंकिट सोबत भागीदारी करून अवघ्या १० मिनिटांत पुणे तील ग्राहकांच्या घरी सिमकार्ड पोहोचविणार

जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : एक प्रवर्तक पाऊल टाकून भारती एअरटेलने आज ब्लिंकिट या क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म सोबत भागीदारीची घोषणा केली आहे जेणेकरून पुणे मधील ग्राहकांना दहा मिनिटांत सिमकार्ड पोहोचविता येणार आहे. एखाद्या टेलिकॉम कंपनी कडून ही पहिलीच सेवा असून आता देशातील १६ शहरांमध्ये ही सेवा सुरू करण्यात आली आहे आणि कालांतराने आणखी शहरांना आणि गावांना जोडण्याची योजना आखली गेली आहे.हे सहकार्य एक महत्त्वपूर्ण टप्पा दर्शवित असून चालत आल्याप्रमाणे ग्राहकांना आता ४९ एवढ्या नाममात्र सुविधा शुल्कात किमान १० मिनिटांत घरपोच सिमकार्ड प्राप्त करता येईल. सिमकार्ड मिळाल्यावर ग्राहकाला आधारवर आधारित के.वाय.सी प्रमाणीकरण करून सोप्या सक्रिय करण्याच्या प्रक्रियेतून नंबर सक्रिय करता येईल. ग्राहकांना पोस्टपेड आणि प्रीपेड दोन्ही प्लॅन्स मधून निवड करण्याचा किंवा एअरटेल नेटवर्कमध्ये पोर्टिंगसाठी एम.एन.पी सुरू करण्याचा पर्याय उपलब्ध केला जाईल.

## युवा सरपंच सचिन पालवे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान



■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्रराज्य यांचे वतीने युवा सरपंच श्री सचिन पोपटराव पालवे ग्रुप ग्रामपंचायत उदरमल– सोकेवाडी यांना राज्यस्तरीय "आदर्श सरपंच पुरस्कार" दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध अभिनेते माननीय श्री मकरंद अनासपुरे यांच्या शुभहस्ते माऊली संकुल अहिल्यानगर येथे प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना सिने अभिनेते माननीय श्री मकरंद अनासपुरे आपल्या भाषणामध्ये म्हणाले की सरपंच हा त्या गावचा पालक असतो समाजातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी लोकांना सहकार्य करणे आवश्यक असते जल, जमीन व झाडे हे तीन मार्ग खेड्यांचा कायापालट करू शकतात विज्ञानामुळे कालांतराने अनेक अडचणी निर्माण होत असतात त्यामुळे खेड्यांचा विकास हाच देशाचा विकास आहे म्हणून खेड्यांचा विकास झाला पाहिजे याप्रसंगी स्वराज्य सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे, एकनाथराव ढाकणे युवा नेते सरपंच सेवा संघ रोहित पवार व महाराष्ट्रतुन अनेक जिल्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना बावड्यात अभिवादन

■ जनप्रवास प्रतिनिधी

बावडा : मौजे बावडा ता.इंदापूर येथील आंबेडकर उद्यानात (दि.१४) एप्रिल रोजी सकाळी ठिक ०९ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनाचे औचित्य साधून आंबेडकर उद्यानात बुध्द पूजा घेण्यात आली.यावेळी बावडा पोलीस चौकीचे पोलीस सहाय्यक निरीक्षक शंकर राऊत यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी धम्म वंदना, संघ वंदना, त्रिसरण पंचशील गाथेचे पठण बौध्दाचार्य गौतम जगताप यांनी केले. या कार्यक्रमा दरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरती लहान मुला – मुलींनी तसेच राजकीय सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.



नवबौद्ध समाजातील पुरूष व महिलांनी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी येथील आंबेडकर उद्यानात सकाळ पासूनच गर्दी केली होती.

या कार्यक्रमाला सरपंच पल्लवी गिरमे, उपसरपंच रणजित घोगरे, ग्रामविकास अधिकारी आंबिका पावसे मॅडम, ग्रामपंचायत सदस्य संतोष सुर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य अश्विनी कांबळे, सुरेश शिंदे सर, विकी दादा घोगरे, पंडीत आबा पाटील, उमेश पाटील, अनिल कांबळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार, सामाजिक, राजकीय, क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते, गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनाचे औचित्य साधून राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उदयसिंह पाटील, माजी सरपंच किरण पाटील, अशोक घोगरे, विकास पाटील, मनोज पाटील, ठाकूर सर, दिनेश पाटील सर, दादा कांबळे, झेंडे मॅडम, शिवाजी विद्यालयातील शिक्षक वर्ग, गावातील सामाजिक, राजकीय क्षेत्रात ,काम करणारे कार्यकर्ते उपस्थित होते. बावडा ग्रामपंचायत कार्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच पल्लवी गिरमे व उपसरपंच रणजित घोगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, गावातील सामाजिक, राजकीय श्रेत्रात काम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आनंदी जीवन जगता आलं पाहिजे : अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे

### दिव्यांग विद्यार्थ्यांनी केली आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : दिव्यांगाकडे पाहिले तर समजते जीवन किती कष्टमय आहे. तरीही हार मानायची नाही. आनंदी जीवन जगायचं असतं ते जगायला शिकलं पाहिजे. आनंदी जीवन जगता आलं पाहिजे .याचे हे ज्वलंत उदाहरण हे विद्यार्थी आहेत.

यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे दिव्यांगांचे आशीर्वाद हेच साक्षात परमेश्वराचे आशीर्वाद असल्याचे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी केले.



सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे हे होते. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रियंका खैरे, विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, संचालिका विद्या भावले, मुख्याध्यापक डी के जगधने. आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ .सी एम मेहता कन्या विद्यालयाचे एन. एम. एम. एस. परीक्षेत घवघवीत यश

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेत डॉ सी एम मेहता कन्या विद्यालयाच्या वैष्णवी सांगळे, तनुजा तुपसैंदर या विद्यार्थिनींनी गुणवत्ता यादीत स्थान पटकविले असून त्यांना वर्षाला १२००० रुपये प्रमाणे चार वर्षात प्रति विद्यार्थिनी ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

तसेच याच परीक्षेत सारथी शिष्यवृत्तीसाठी विद्यालयाच्या तनुजा आरोटे, संस्कृती वक्ते, वैष्णवी दवंगे, वैष्णवी थोरात, ज्ञानेश्वरी गवारे, वैष्णवी मोरे, या विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या असून या विद्यार्थिनींना प्रतिवर्ष ९६०० रुपये प्रमाणे चार वर्षासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे.



या परीक्षेत विद्यालयाच्या एकूण २७ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना विभाग प्रमुख पवार आर एस, मुंढे ए डी, , शिंदे आर आर, भोये डी वाय, यांचे मार्गदर्शन लाभले असून, विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता .या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य पद्माकांतजी कुदळे, अरुण चंद्रे सर, माजी विभागीय अधिकारी सोनवणे एन एस, स्कूल कमिटीच्या सदस्या स्वप्नजा वाबळे, स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य बाळासाहेब नरोडे, अशोकराव टुपके, पालक संघाचे उपाध्यक्ष युसुफ रंगरेज, दिलीप तुपसैंदर, हिंगे सर, विद्यालयाच्या प्राचार्या अनिता धनक, उपमुख्याध्यापक रावसाहेब शिंदे, पर्यवेक्षक प्रभाकर आभाळे, सुनीता पवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## निरोगी आरोग्यासाठी योग प्राणायाम महत्त्वपूर्ण इंटरनॅशनल योग प्रशिक्षक डॉ.सौ.अलका जाधव

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

इंदापूर : पतंजली योग समिति व महिला पतंजली योग समिति इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. १६/०४/२०२५ रोजी पहाटे ५ ते ७ वा. पर्यंत शहा सांस्कृतिक भवन येथे खास महिलांसाठी अवघड अवघड आसनांची प्रात्यक्षिके डॉ अलका जाधव यांनी करून दाखवली या एक दिवसीय शिबिराचे उद्घाटन इंटरनॅशनल योगा ट्रेनर.डॉ.सौ अलका जाधव,योगशिक्षिका सौ.सुरेखा फाळके, श्री. विलास जाधव. पतंजली योग समितीचे अध्यक्ष मा श्री दत्तात्रय अनपट उपाध्यक्ष श्री शहाजी बोराटे त्याचबरोबर महिला पतंजली योग समितीच्या अध्यक्षा मा सौ मायाताई विंचू, तसेच सौ. शोभाताई भरणे,सौ उमाताई इंगोले. महीला पतंजली योग सामिति उपाध्यक्ष मा सौ राजश्रीताई शिंदे, कार्याध्यक्ष सौ कल्पना भोर, मार्गदर्शिका सौ निर्मलाताई कवितके सौ. अमिताताई पाडूळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी बहुसंख्येने इंदापूर तालुक्यातून पुरुष व महिला साधक उपस्थित होते तसेच कालठण न.१ मधील दोन्ही वर्गातील योग साधक व योग शिक्षक श्री. मांढरे काका उपस्थित होते



याप्रसंगी डॉ.सौ अलका जाधव यांनी ६५ व्या वर्षी अवघड अवघड आसनांची प्रात्यक्षिके करून दाखवली त्यांनी केलेली आसने पाहून उपस्थित साधक आनंदी झाले आज पर्यंत त्यांना दोनशेहून जास्त सुवर्ण पदक मिळालेली असून भारतातील महत्त्वपूर्ण असा भारत योगरत्न पुरस्कार, तसेच रशिया,थालंड, साऊथ कोरिया या देशांचे सवर्ण पदक त्यांना मिळालेली आहेत

यावेळी त्यांना पतंजली परिवाराच्यावतीने जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उपस्थित पत्रकार बांधव यांचा पण यथोच्छीत असा सन्मान करण्यात आला

दादासाहेब पाटील विद्यालयाची विद्यार्थिनी कु. साक्षी सतिश चोपडे हीने रीदमीक योगा वरती आसणे करून दाखविली तिचा सन्मान डॉ. अलकाताईंच्या हस्ते करण्यात आला

या कार्यक्रमाचा योग घडवून आणला असे पतंजली योग परीवाराचे मार्गदर्शक श्री. वसंत जाधव सर व सेवानिवृत अधिकारी उच्च उर्जा पदार्थ संशोधन लॅबोरेटरी पाषाण पुणे संरक्षण संशोधन संस्था. ब्रह्मोस, अग्नी,आकाश, मिसाईल विकास करण्यासाठी सहभाग असे श्री. सत्यवान जगताप

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक योग परिवाराचे अध्यक्ष श्री दत्तात्रय अनपट यांनी केले त्याचबरोबर हा कार्यक्रम व्यवस्थित पारपाडण्यासाठी चोख व्यवस्थेचे नियोजन करणारे, श्री. जितेंद्र माने व त्यांना साथ देणारे सर्व साधक टीम, तसेच सूत्रसंचालन सौ. सुनिता गलांडे यांनी केले व सर्वांचे आभार सौ. मायाताई विंचू यांनी मानले

## पीअँडजी शिक्षाचा प्रभावी दोन दशकांचा उत्सव

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया या कंपनीचा प्रमुख कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रम असलेल्या पीअँडजी शिक्षाने यंदा एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून, शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलविणाऱ्या त्यांच्या २० वर्षीय योगदानाचा उत्सव साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांमध्ये, या कार्यक्रमाने देशातील दुर्लक्षित समुदायांमध्ये शिक्षण उपलब्ध करून देऊन आणि शिकण्याच्या संधी सुधारून ५० लाखांहून अधिक मुलांचे जीवन सकारात्मक पद्धतीने बदलले आहे. या प्रवासाचा सन्मान करण्यासाठी, पीअँडजी ने ट्वेंटी टेल्स ऑफ ट्रायम्फ नावाचं खास कॉफी टेबल बुक सादर केलं आहे, ज्यामध्ये बदल आणि शक्यतांच्या प्रेरणादायी कहाण्या समाविष्ट आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक मुलाला विकासाची संधी दिल्यास काय बदल घडू शकतो, याचं हे शक्तिशाली उदाहरण आहे. प्रत्यक्ष जमिनी पातळीवर मजबूत कार्यक्रमांसोबतच, पीअँडजी शिक्षा या उपक्रमाने लर्निंग गॅप्स (शिक्षणातील अंतर) विषयी जनजागृती करण्यावरही भर दिला आहे.

## बावडा येथे वडार समाज बांधवांच्या वतीने हनुमान जयंती साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

बावडा : मौजे बावडा ता.इंदापूर जि.पुणे या ठिकाणी (दि १२) एप्रिल रोजी सायंकाळी ०६ वाजता हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी हनुमान प्रतिमेचे पूजन उदयसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. वडार समाज बांधवांच्या वतीने हनुमान जयंतीचे औचित्य साधून हनुमान प्रतिमेची मिरवणूक बावडा गावातून काढण्यात आली. या हनुमान जयंती कार्यक्रमाला मधूकर चव्हाण, श्रीकांत चव्हाण, बाळासाहेब देवकर, सामाजिक कार्यकर्ते दादा गिरमे, दादा कांबळे यासह वडार समाज बांधव, पोलिस कर्मचारी, गावातील ग्रामस्थ मोठ्या संख०येने उपस्थित होते.

# अवैध गुटख्याचा साठा श्रीगोंदा तालुक्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला

## आठ लाखाचा मुद्देमाल जप्त; दोघा जणांना घेतले ताब्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : अहील्यानगर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशाने पो.नि दिनेश आहेर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांना श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध धंद्याबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले होते. स्थानिक गुन्हे शाखा पथकाचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर सह पथक हे

श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये अवैध धंदयाची माहिती घेत असताना, पथकास गुप्त खबऱ्या मार्फत आरोपी दिपक नाना टकले व पंकज नाना टकले, रा.काष्टी, ता.श्रीगोंदा हे महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीस प्रतिबंध असलेली व शरिरास अपायकारक होईल असा पानमसाला व सुगंधीत तंबाखु गुटखा त्यांच्या जवळ असुन मंगळवार दि.१५ एप्रिल२०२५ रोजी विर्कीसाठीएमएच-१६-सीक्यु-८६७३ या वाहनामधुन श्रीगोंदा येथुन काष्टीकडे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पथकाने मिळालेल्या माहितीवरून काष्टी ते श्रीगोंदा जाणारे रोडलगत दांगड लॉन्स परिसरामध्ये सापळा रचुन संशयीत वाहनाचा शोध घेऊन, संशयीत वाहनास थांबवून वाहनातील व्यक्तीना पोलीस पथकाची ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी दिपक नाना टकले,वय ३१, पंकज नाना टकले, वय २८ दोन्ही रा.इंद्रप्रस्थ पार्क, काष्टी, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथील असल्याचे सांगितले. यावर आरोपीच्या ताब्यातील वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये विमल, हिरा, आरएमडी कंपनीचा पानमसाला, विविध प्रकारची सुंगधीत तंबाखु मिळून आली.पथकाने



आरोपीचे ताब्यातुन ८ लाख,१३ हजार ९२७ रूपये किंमतीचा मुद्देमाल त्या मध्ये विमल, हिरा, आरएमडी कंपनीचा पानमसाला, विविध प्रकारची सुंगधीत तंबाखु, मोबाईल व एक सुझुकी कंपनीची इको कार एमएच-१६-सीक्यु-८६७३ असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पथकाने ताब्यातील आरोपीकडून जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबत कसुन चौकशी केली असता दिपक नाना टकले याने विमल व हिरा पानमसाला व त्याचे सोबतची सुगंधीत तंबाखु ही आरोपी ३) अविनाश ढवळे पुर्ण नाव माहित नाही रा.भिगवन, इंदापूर, जि.पुणे (फरार) याच्याकडून खरेदी केली आहे. तसेच आरएमडी पानमसाला व त्यासोबत सुगंधीत तंबाखु ही ४) नौशाद सिध्दीकी पुर्ण नाव माहित नाही रा.साळुमाळु, पारगाव, ता.दौंड, जि.पुणे (फरार) यांच्या कडून त्याचा कामगार ५) मिराज हमीद शेख, रा.टाकळीभिमा, ता.दौंड, जि.पुणे (फरार) याच्यामार्फत खरेदी केल्याची सांगितले ताब्यातील मुद्देमालासह आरोपी नां श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात येऊन त्यांच्याविरूध्द श्रीगोंदा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास श्रीगोंदा पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

# प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी अडवली रस्त्याच्या प्रश्नासाठी सरपंचांची गाडी

## पुनर्वसित गाव असूनही रस्त्या न झाल्यामुळे होत आहेत नागरिकांचे हाल

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगावा : शेवगाव तालुक्यातील पुनर्वसित गाव नवीन दहिफळ या ठिकाणच्या महिला सरपंच सविता बाळासाहेब शिंदे यांची गाडी प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी रस्त्याच्या प्रश्नासाठी शनिवार दि १२ रोजी गाडी अडवली. यावेळी चिमुकल्यांनी आम्हाला पक्का रस्ता करून द्या ! अशी मागणी सरपंचांना केली आहे.

याविषयी सविस्तर वृत्तांत असे की नविन दहिफळ या गावाच्या महिला सरपंच सविता बाळासाहेब शिंदे या काही कामानिमित्त पंचायत समिती या ठिकाणी जात असताना नवीन दहिफळ येथील शिंदे वस्ती-चांदगांव या रस्त्यावर चिमुकल्यांनी त्यांची गाडी अडवून त्यांना प्रथम रस्त्याची मागणी केली. यावेळी



सरपंचांनी चिमुकल्यांना मी शासन दरबारी स्वत: गावची सरपंच या नात्याने मागील वर्षी पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या रस्त्यासह अनेक प्रस्तावित प्रश्नाचे प्रस्ताव सादर केले आहेत असे सांगून त्यांना दिलासा दिला. मात्र या रस्त्यामुळे दरवर्षीच चिमुकल्यांचे पावसाळ्यामध्ये हाल होत आहेत. याकडे शासनाने वेळोवेळी दुर्लक्ष केले आहे. सरपंचांना प्रत्युत्तर म्हणून या चिमुकल्यांनी आमची भेट मुख्यमंत्री साहेबांशी घालून द्या !


आम्ही साहेबांना आमचे प्रश्न मांडू अशी साद घातली आहे. पुनर्वशीत गाव असूनही अद्याप पर्यंत या गावाला प्राथमिक सुविधा देणारे उपयुक्त असणारे रस्तेही प्रशासनाकडून देण्यात आलेली नाहीत. यामुळे गावातील नागरिकांना विद्यार्थ्यांना तसेच वयोवृद्ध व्यक्तींना पावसाळ्यामध्ये येण्या जाण्यासाठी मोठ्या करण्यासाठी अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे.

## डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बायोपिकचा नवीन पोस्टर प्रकाशित

■ जनप्रवास प्रतिनिधी

मुंबई : निर्माता अभिषेक अग्रवाल यांच्या वाढदिवसाच्या खास प्रसंगी, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित बहुप्रतिक्षित बायोपिकच्या निर्मात्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि चित्रपटाचा एक प्रभावी नवीन पोस्टर प्रदर्शित केला. हा चित्रपट डॉ. कलाम यांच्या असाधारण जीवनयात्रेचं मोठ्या पडद्यावर सादरीकरण करणार आहे ` रामेश्वरम, तमिळनाडू येथून राष्ट्रपती भवनापर्यंत, भारताचे ११वे राष्ट्रपती बनण्यापर्यंतची त्यांची प्रेरणादायी कहाणी यात मांडण्यात येणार आहे. अभिषेक अग्रवाल आणि ए.के. एंटरटेनमेंट्स निर्मित हा चित्रपट ए.पी.जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनच्या घनिष्ठ सहकार्याने तयार केला जात आहे, जेणेकरून भारताच्या या प्रिय आणि सन्माननीय व्यक्तिमत्वाचे चित्रण प्रामाणिकपणे आणि सन्मानाने करता येईल.

# तनपूरे यांच्या उपोषणाला पाठिंबा; राहुरी शहरात कडकडीत बंद



■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना झाली. या घटनेच्या निषेधार्थ माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी बेमुदत उपोषण सुरू केले. आज उपोषणाचा तिसरा दिवस असून त्यांच्या उपोषणास पाठिंबा म्हणून राहुरी तालुका बंद ठेवण्यात आलाय.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली. या घटनेला २१ दिवस झाले, मात्र अद्याप पोलीस प्रशासनाकडून आरोपींचा शोध लागला नाही. आरोपींचा तात्काळ शोध घेण्यात येऊन आरोपींची नावे जाहीर करावी. या मागणीसाठी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी दि. १४ एप्रिल पासून शहरातील शनीचौक येथे बेमुदत उपोषण सुरु केले. आज उपोषणचा तीसरा दिवस आहे.

तनपूरे यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून आज पून्हा एकदा राहुरी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

व्यापाऱ्यांनी उपोषणाला पाठिंबा देऊन स्वयंस्फूर्तीने एक दिवस बंद पाळला आणि आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली. दरम्यान अनेक संघटनांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या उपोषणाला पाठिंबा दर्शवीला.

## श्री शिवाजी विद्यालयात आंबेडकर जयंती साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

बावडा : मौजे बावडा ता. इंदापूर येथील असणाऱ्या श्री शिवाजी विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली.यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे प्राचार्य डी आर घोगरे सर व मदन हराळे सर यांच्या हस्ते करण्यात आले.



डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरती शाळेतील मुला -मुलींनी संस्था निरीक्षक मदन हराळे सर, आर.जे.ताटे मॅडम यांनी आपली मनोगते व्यक्त केली.या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थिनी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांना संविधानाची आवड निर्माण व्हावी भारतीय लोकशाहीचा कणा असलेली घटना म्हणजेच भारतीय संविधान भारतीय संविधानाची जनजागृती, संविधानाचे महत्त्व संविधानाची व्यापकता या गोष्टी विद्यार्थ्यांना समजल्या पाहिजे. आपणच समोर येऊन संविधानाचे संरक्षण केलं पाहिजे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून आर जे ताटे मॅडम यांनी स्वखर्चातून श्री शिवाजी विद्यालयास भारतीय संविधान पुस्तक भेट म्हणून दिले.भारतीय संविधान हे पुस्तक श्री शिवाजी विद्यालयाच्या वाचनालयात विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी ठेवण्यात येणार असल्याची माहिती देखील आर.जे ताटे मॅडम यांच्या वतीने देण्यात आली.या कार्यक्रमाला हासे सर, झेंडे मॅडम शिक्षक-शिक्षिका शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाथर्डी पाणी टँकर घोटाळा

## पाणी उदभवावर गैरहजर असणाऱ्या पाथर्डी पंचायत समितीच्या परिचरास गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांनी काढली नोटीस !

■ जनप्रवास प्रतिनिधी

शेवगावा : अगोदरच महाराष्ट्रभर गाजत असलेल्या पाथर्डी पाणी टँकर घोटाळ्यामुळे पाथर्डी चे पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी अडचणीत सापडलेले असतानाच पाथर्डी पंचायत समितीतील परिचर टँकर मध्ये पाणी भरणाऱ्या शेवगाव तालुक्यातील अमरापुर येथील उद्भवावर गैरहजर असल्याने पाथर्डी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे यांनी संबंधित परिचारास याबाबत नोटीस पाठवून खुलासा मागितला आहे. त्यामुळे एकूणच पाथर्डी पंचायत समितीतील कर्मचारीच या पाणी टँकर घोटाळयाला सहकार्य करत असल्यास उघडकीस आले आहे. असा आरोप पाणी टँकर घोटाळ्यातील तक्रारदार शैलेंद्र जायभाये यांनी केला आहे. या संदर्भात पाथर्डी पंचायत समितीचे गटविकास



अधिकारी शिवाजी कांबळे यांनी पाथर्डी पंचायत समितीचे परिचर किरण कारखिले यांना पाठवलेल्या नोटिस मध्ये म्हटले आहे की, उपरोक्त विषयानुसार तुमची नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात पाणी टंचाई निवारनार्थ मौजे- अमरापुर ता.शेवगाव येथील पाण्याच्या उदभवाच्या ठिकाणी टँकरच्या खेपा नोंदविणे तसेच उदभवावर पुर्ण क्षमतेने टँकर चालकाकंकडुन खेपा करुन घेणेकामी दि ०६ एप्रिल २०२५ अन्वये करण्यात आलेली तथापी माझे असे निदर्शनास आले आहे की, तुम्ही दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी तुम्हास नियुक्त करण्यात

आलेल्या ठिकाणी मौजे- अमरापुर ता.शेवगाव येथील उदभवावर गैरहजर असल्याचे निदर्शलास आले आहे. सदरची बाब ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे त्यास्तव तुमची दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजीची विनावेतन रजा का करण्यात येऊ नये ? तसेच तुम्ही सदरच्या दिवशी गैरहजर असल्याने मौजे- अमरापुर उदभवावरील अडचणी निर्माण झालेल्या आहेत याबाबतची जबाबदारी तुमच्यावर निश्चीत करण्यात येवुन सदरच्या खेपा बाबतची अनियमीतता लक्षात घेवुन तुमचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३ या नुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावीत का करण्यात येवु नये याबाबतचा लेखी खुलासा सदरची नोटीस मिळताच २ दिवसाचे आत इकडेस समक्ष सादर करावा. तुमचा खुलासा मुदतीत व समर्पक नसल्यास तुमचे काहीही एक म्हणने नाही असे समजुन तुमचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना अहवाल सादर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

असे गटविकास अधिकारी यांनी पाठवलेल्या नोटिसीत म्हटले आहे.

## मुख्याध्यापिका खोमणे यांच्या काळात शाळा प्रगती पथावर - सुनिता गावडे

■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळी हाजी : टाकळी हाजी येथील जि.प.प्राथमिक शाळेत आशा कारभारी खोमणे यांची समायोजन बदली आमदाबाद शाळेत झाल्याने निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका खोमणे यांचे फुलांची उधळण करत तसेच टाळ्यांच्या गजरात प्रभावी स्वागत केले. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या वतीने खोमणे यांना सुवर्णमुद्रिका तसेच साडी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



मुख्याध्यापिका खोमणे यांच्या काळात शाळा प्रगती पथावर पोहचली असे माजी जिल्हा परिषद सदस्या सुनीता गावडे यांनी सांगितले.यावेळी केंद्रप्रमुख महादेव बाजारे यांनी खोमणेंच्या शैक्षणिक कामाबद्दल कौतुक केले, या शाळेत सन २०१० साली इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत दहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले, २०१६ साली जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा महोत्सवात अनेक वेळा जिल्ह्यामध्ये, तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविण्यात यश आले. ज्या शाळेत मी शिकले त्याच शाळेचा नावलौकिक वाढविण्याचा मान मिळाला असे खोमणे यांनी सांगितले.

मंथन परीक्षेत यशस्वी विद्यार्थी आदिती शिंदे, शौर्य शिंगाडे, रोशन घोडे, स्वराज ठुबे, प्रज्वल गावडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास सरपंच अरुणा घोडे, चेअरमन बन्सीशेठ घोडे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष किरण कांदळकर, उपाध्यक्ष धनश्री गावडे, सेवानिवृत्त प्राचार्य प्रभाकर खोमणे, सुगंधा खोमणे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास खोमणे, सुनील पोकळे, प्रसाद मुळे, आशा बोखारे पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन शाळेच्या मुख्याध्यापिका मंगल गावडे, मच्छिंद्र देवकर, प्राजक्ता देशमुख, अर्जुन पांढरकर यांनी केले. प्रास्ताविक अर्जुन पांढरकर यांनी तर आभार मंगल गावडे यांनी मानले.

## नगर-मनमाड राज्य महामार्गावर चक्काजाम आंदोलन

■ जनप्रवास प्रतिनिधी

क्षज्ञसक्षिंह :

राहुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याच्या घटनेला तब्बल २१ दिवस उलटून गेले. मात्र अद्याप आरोपींचा तपास लागला नाही. या घटनेच्या निषेधार्थ आज विविध संघटनांनी एकत्र येत नगर मनमाड राज्य महामार्गावर चक्काजाम आंदोलन करून आरोपीला तात्काळ अटक करावी, अशी मागणी केली.

राहुरी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली होती. सदर घटनेला आज २१ दिवस उलटून गेले. मात्र अद्याप पोलीस प्रशासनाकडून आरोपींचा तपास लागला नाही. एका दिवसात आरोपींना अटक



करा, अन्यथा उद्यापासून तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा आज सकाळी नगर मनमाड राज्य महामार्गावर चक्काजाम आंदोलन प्रसंगी देण्यात आला. आरोपींना अद्याप अटक झाली नाही. या घटनेच्या निषेधार्थ आज सकाळी आरपीआय, वंचित बहुजन आघाडी तसेच राहुरी शहरातील जय भीम मित्र मंडळाच्या वतीने नगर मनमाड राज्य महामार्गावर अचानकपणे चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सुमारे अर्धा तास वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली. आज आरोपींना अटक न झाल्यास उद्या पासून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी कार्यकर्त्यांनी दिला. यावेळी अरुण साळवे, पिंटूनाना साळवे, निलेश जगधने, माजी नगरसेविका मंदाकिनी साळवे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. छत्रपतींच्या सन्मानासाठी प्रथमच महिला रस्त्यावर उतरल्याचे आज दिसून आले.

यावेळी माजी नगरसेवक अरुण साळवे, संजय साळवे, मधुकर साळवे, प्रविण लोखंडे, पिंटूनाना साळवे, सुनिल चांदणे, निलेश जगधणे, सागर साळवे, किरण साळवे, दादु साळवे, दिपक साळवे, नविन साळवे, करण साळवे, सुरज साळवे, कैलास साळवे, माजी नगरसेविका मंदाकिनी साळवे, निताताई साळवे, उज्वला साळवे, भारती साळवे, उज्वला गुजर, मंगल खंडागळे, संगीता साळवे, प्रमिला कसबे, सारिका साळवे, तब्बसूम पठाण आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरूषहो, तुमच्या 'या' चित्रविचित्र सवयी महिलांना वाटतात अत्यंत सेक्सी व आकर्षक

आता ही गोष्ट तर तुम्ही देखील मान्य कराल की स्त्रियांची आवड समजून घेणे किती कठीण गोष्ट आहे. याचे एक कारण हे सुद्धा आहे की त्यांचे मन खूप चंचल असते. त्यांना कधी ही गोष्ट हवी असते तर कधी ती! त्या स्वत:च या बाबत ठाम नसल्याने खरा कस हा पुरूषांचाच लागतो. पण असे असून सुद्धा प्रत्येक स्त्रीला एक असा पार्टनर हवा असतो जो केवळ दिसायलाच वेल ड्रेस नसेल तर त्याचा सेन्स ऑफ ह्युमर देखील कमालीचा असेल.

अर्थात आपल्याला नक्की कसा जोडीदार हवा आहे याच्या प्रत्येक स्त्रीच्या अपेक्षा वेगळ्या असतात आणि त्या अपेक्षांची एक मोठी यादी त्यांच्याकडे असते असे म्हटले तरी वावगे ठरू नये. पण या सगळ्या शिवाय सुद्धा स्त्रिया पुरूषांमध्ये अशा काही गोष्टी नोटीस करतात ज्या त्यांना केवळ सेक्सीच वाटत नाही तर त्या आपसूकच अशा पुरूषांकडे आकर्षित होतात.

**सुंदर डोळे**

ज्या पुरुषांचे डोळे खूप सुंदर आणि पापण्या लांब असतात त्यांच्याकडे स्त्रिया अनपेक्षितपणे आकर्षित होतात. त्यांनी जरी ठरवलं की अशा पुरुषाकडे बघायचं नाही तरी त्यांच लक्ष त्याच्याकडे जातं. होतं का तर नाकी डोळी धारदार असणारे पुरुष जेव्हा एखाद्या स्त्री सोबत बोलतात तेव्हा त्या स्त्रीचे लक्ष साहजिकच त्या पुरुषांच्या डोळ्यांकडे जाते आणि त्या काही सेकंद का होईना पण खास करून त्या डोळ्यांच्या प्रेमात पडतात आणि जर सारखी फिरून त्या पुरुषाकडे जाते.

**गंभीर आवाज**

मुल हे मुलगी दिसायला किती सुंदर आहे त्यावरून तिच्याकडे पाहतात वा तिच्या प्रेमात पडतात. तर स्त्रिया या अनेकदा आवाजाच्या प्रेमात पडतात असे दिसून आले आहे. अनेक स्त्रियांनी कबूल देखील केले आहे की पुरूषांचा आवाज त्यांना आकर्षित करतो ज्या पुरूषांचा आवाज गंभीर, खोल आणि मादक असतो ते सहज स्त्रियांना आकर्षित करतात. याचे कारण



म्हणजे अशा पुरूषांचा कानी पडणारा आवाज स्त्रियांना आवडतो. अशा पुरुषांनी फक्त बोलत राहावं आणि आपण ऐकत राहावं असं त्यांना वाटतं.

**शरीरातून येणारा सुगंध**

पुरूषांची ही एक गोष्ट आहे जी स्त्रियांना खूप जास्त पसंत असते. ज्या पुरूषाच्या शरीरातून सुगंधी मादक सुवास येतो त्या पुरुषाकडे स्त्रिया लागलीच खेचल्या जातात. स्त्रियांना असे पुरुष खूप जास्त आवडतात आणि अशा पुरूषांच्या त्या अधिक प्रेमात पडतात. पुरूषांचा हा सुगंध केवळ स्त्रियांना आपल्याकडे आकर्षितच करत नाही तर त्यांना सतत त्यांच्या जवळ राहण्यास सुद्धा भाग पाडतो. होय, बऱ्याच मुली चांगल्या बेधुंद करणाऱ्या सुगंधासाठी वेड्या असतात. त्यांना अशी मुलं आवडतात, ज्यांच्या शरीरातून सतत गोड सुवास दरवळत असतो. पुरूषांच्या शरीराचा हा मन तृप्त करणारा सुगंध त्यांना फक्त भुरळच घालत नाही तर सतत जवळ राहण्यासही भाग पाडतो.

**आत्मविश्वासी पुरुष**

आत्मविश्वास ही अशी गोष्ट आहे जी एखाद्या सुंदर ललनेलाही अशा पुरुषाकडे आकर्षित करू शकते जो दिसायला अगदी एव्हरेज आहे. लहान वयात मुलींना होणारं प्रेम हे चेहरा पाहून होतं. पण जशा त्या मोठ्या होतात आणि सारासार विचार करू लागतात, तेव्हा भविष्याच्या दृष्टीने त्यांना आत्मविश्वासी पुरूष जास्त पसंत येऊ लागतो. कारण त्यांच्या सोबत आपली सर्व स्वप्ने पूर्ण होतील अशी आशा त्यांना वाटते. त्यामुळे जेव्हा एखाद्या पुरुषात आत्मविश्वास भरभरून दिसतो तेव्हा स्त्रिया त्याच्याकडे लगेच आकर्षित होतात.

**वयाने मोठा पुरुष**

मॅच्युअर्ड मॅन हा नेहमीच स्त्रियांना आकर्षित करतो असे म्हणतात आणि ही गोष्ट अगदी खरी आहे. आपल्यापेक्षा जास्त वयाचा पुरुष हा स्त्रियांना अधिक चांगला वाटू लागतो. त्याच्या सोबत त्यांना सुरक्षित फील होते. त्यामुळे स्त्रिया नेहमी अशाच पार्टनरच्या शोधात असतात जो वयाने जास्त नाही पण थोडा मोठा असेल, कारण तो आपली सतत काळजी घेईल आणि आपल्याला समजून घेईल अशी आशा त्यांना असते. शिवाय वयाने मोठा माणूस सेटल असतो आणि अनुभवाने सुद्धा समृद्ध असतो ज्यामुळे नात्यावर ताण येत नाही असं मुलींचं मत असतं.

**लहान-सहान गोष्टींवर भर देणारा**

अलगद तिचा हात पकडणारा, मागून येऊन आपल्या हातांचा विळखा तिच्या शरीराभोवती घालून मिठीत घेणारा, मानेचे चुंबन घेणारा, घरातील स्त्रियांविषयी बोलताना कायम आदराने बोलताना, स्वयंपाकघरातील गोष्टींचं ज्ञान असणारा आणि ती किती सुंदर दिसते हे तिला सांगणारा या सर्व गोष्टी करणारा पुरुष प्रत्येक स्त्रीला आश्चर्यकारक, अधिक आत्मविश्वासू आणि सेक्सी वाटतात.

■■■

# दुसऱ्या स्त्रीला विरोध करण्याची वृत्ती टाळली पाहीजे

स्त्रियांनी खरं तर स्त्रियांना समजून, सांभाळून घ्यायचं असतं. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचे दुःख वा यातना फार चांगल्या रितीने समजू शकते; पण तसं प्रत्यक्षात मात्र होताना दिसत नाही. एखादी स्त्री कार्यालयात नटून थटून आली, तर पुरुषांपेक्षा इतर स्त्रियाच तिच्याकडे वेगळ्या नजरेने पाहतात व आज काय विशेष ? म्हणून विचारतात. पुरुष वरील प्रसंगात त्या स्त्रीला पटकन या नटण्यामागचे कारण विचारणार नाही; पण स्त्रिया मात्र लगेच दखल घेतात आणि टिप्पणी करतात. स्त्रियांच्या तोंडात डाळ भिजत नाही म्हणतात हे याच कारणासाठी ! गुप्तता राखणे, प्रसंगी गप्प बसणे यांना बहुधा जमतच नाही.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांची फार गळचेपी व अवहेलना झाली. स्त्रियांना पुरुषांनी मुद्दामच मागे ठेवले, अशी तक्रार गेल्या पन्नास ते साठ वर्षांपासून सुरू झाली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वच समाजाने एक सुटकेचा निःश्वास टाकला. पारतंत्र्य म्हणजे लाजीरवाणे जीणे असा समाज म्हणत असतानाच, त्याच दरम्यान आता समाजाला तर स्वातंत्र्य मिळालंय; पण इथल्या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना पारतंत्र्यात ठेवलंय. त्यांना त्यांचे स्वातंत्र्य द्या. स्त्रियांना उंबऱ्याबाहेर पडू द्या, अशी हाकाटी महिलांच्यात सुरू झाली आणि तेव्हापासून स्त्रियांकरिता निरनिराळी प्रगतीची उद्योग –



व्यवसायाची व शिक्षणाची दालने मोकळी करण्यात आली. त्यानंतर महिलांकरिता स्वतंत्र शिक्षण संस्था व सहकारी संस्थाही निघाल्या. महिलांनी अर्धे आकाश आमचे म्हटले, त्याला पुरुषांनी अजिबात आक्षेप घेतले नाहीत. उलट आता स्त्रीहितदक्ष असे कितीतरी कायदे निघाले आहेत. एवढं सगळं झालं. स्त्रियांचा विकास, प्रगती अगदी पुरुषांच्या बरोबरीला आली; पण असेही आढळून येत आहे की, स्त्री विकासाला काहीवेळा स्त्रीच अडसर बनत आहे. वंशाला दिवा हवा म्हणून पुरुषांबरोबर स्त्रीच आग्रह करताना दिसते. दिवाच हवा, पणती नको म्हणताना मुलींचे गर्भ पाडण्यात स्त्रीचा व महिला डॉक्टरांचाही सहभाग आढळून येताना दिसतो. सुनेला जाळून मारण्यात, हुंडाबळी घेताना घरातील सासू-नणंदेच्या रूपात स्त्रीचाही सहभाग आढळतो. पुरुषांच्या बरोबरीने त्याही गुन्हा करतात. एखादी स्त्री कुमारी माता, प्रौढ विवाहिता दिसल्यास त्यांची थट्टा करण्यात स्त्रियांचाच पुढाकार असतो. एखाद्या स्त्रीने आपली जीवनशैली बदलली, तर त्याची दखल पुरुषांआधी इतर स्त्रियाच घेताना दिसतात, एखाद्या विधवेने पुनर्विवाह केला, तर त्याचा गहजब स्त्रियाच करतात. स्त्रियांची दृष्टी तुलनात्मकदृष्ट्या पुरुषांच्या विरोधात जेवढी असते, तेवढीच स्त्रीविरोधी असते. स्त्री जर एखाद्या स्त्रीचा विरोध करू लागली, तर खूपच आकांडतांडव करते. तसे पुरुष एकमेकांबाबत दुस्वास करताना वा भांडताना दिसत नाहीत. स्त्रियांची प्रगती व्हावी ही सर्वांचीच प्रांजळ इच्छा आहे. एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मा हिस्सा त्यांचाच आहे. स्त्रियांनी विशेष करून एक गोष्ट सर्वप्रथम करावी ती अशी की, त्यांनी आपल्याच स्त्रीजातीचा विरोध टाळून सकारात्मक भूमिका वठवावी. एकमेकींचा आदर राखावा. कारण एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीला चांगल्यारितीने गौरव दिसायला हवा असेल, तर स्त्रियांनी आपली एकी राखली पाहिजे व सकारात्मकता अंगी बाणवली पाहिजे. दुसऱ्या स्त्रीला विरोध करण्याची वृत्ती टाळली पाहिजे.

# ऑफिसात गोंगाट करू नका



ऑफिस म्हणजेच कामासोबतच्या धावपळीचे केंद्र, तिथे फोनच्या घंट्या वाजत राहणार, डेस्क फोन नसला तरी मोबाईलच्या रिंग्ज भणभणत राहणार. निरनिराळ्या उपकरणांचे आवाज आणि कर्मचाऱ्यांची वर्दळ चालू राहणार. आणि असे ऑफिस ही तर यशाची पावती असते.

अन्यथा एखादे शांत ऑफिस म्हणजे कंपनी आतबट्ट्यात वा अखेरचे क्षण मोजत असल्याचे संकेत असतात. पण अशा कोलाहलात काम तर सूचायला हवे. या कोलाहलापासून सुटका अशी मिळवता येईल ते पाहू.

**रेडिओ सीडी** – जर आपली कंपनी परवानगी देत असेल तर आपण अत्यंत मंद हलक्या आवाजात म्युझिक वाजवू शकता. त्यामुळे इतर बडबडीपासून मुक्ती मिळू शकले व आपण आपले काम एकाग्रतेने करू शकाल; पण गाण्यासोबत स्वतः गाऊ नका. त्यामुळे ऑफिसात गोंगाट होईल.

**झाडे-झुडपे** – झाडे गोंगाट दूर करण्यास खूपच मदत करतात. यासाठी व्यवस्थापनाला ऑफिसात काही रोपे ठेवायला सांगा. यामुळे ऑफिसही सुंदर दिसेल.

**आवाज दडपणाऱ्या वस्तू** – आपल्या ऑफिसात पडदे, गालिचा असा ध्वनिरोधक वस्तू वापरण्यास सांगावे.

**गोंगाट करणाऱ्यांशी बोला** –जर आपल्या ऑफिसात एखादीच व्यक्ती गोंगाट उत्पन्न करीत असेल, तर तिला भेटून आवाज कमी करण्याविषयी बोला.**साईड प्रूफ जागा** – गोंगाट टाळण्यासाठी आपले काम ऑफिसातील साउंडप्रूफ जागेत जाऊन करू शकता.

# गॅस शेगडी सिलेंडरपासून थोडी दूर ठेवावी...

स्वयंपाकाचा गॅस वापरणे जेवढे सोपे असते तेवढीच त्याची देखभाल करणेही गरजेचे असते. गॅसचा काटकसरीने कसा वापर करावा व देखभाल कशी करावी याविषयी संपूर्ण माहिती महिलांना असायला हवी.

♦ गॅस शेगडी सिलेंडरपासून थोडी दूर ठेवावी. जमल्यास शेगडी सिलेंडरपेक्षा उंचीवर ठेवावी.

♦ गॅसचा वापर करीत नसाल तेव्हा त्याचा रेग्युलेटर अवश्य बंद करावा.

♦ किचनला खिडकी असायलाच हवी. त्यामुळे `स्वयंपाक करताना धूर कोंडीला जाणार नाही.

♦ गॅस पेटण्यापूर्वी काय तयार करायचे आहे हे लक्षात ठेवा व त्यानुसार भांडे अगोदरच काढून ठेवा. भांडे गॅसवर ठेवूनच गॅस पेटवा.

♦ गॅसवर स्वयंपाक करताना प्रेशर कुकरचा वापर करा व डाळी इ. भिजवून ठेवा. त्यामुळे वेळही वाचेल व गॅसही वाचेल उघड्या भांड्यांचा वापर टाळा. जर वापरायची असतील, तर झाकण ठेवूनच पदार्थ शिजवा.

♦ भांड्यांच्या आकाराप्रमाणेच बर्नर निवडा. छोट्या भांड्यासाठी छोटा तर मोठ्या भांड्यांसाठी मोठा बर्नर वापरल्यास गॅस वाया जात नाही.

♦ फ्रीजमधील कणीक, डाळी, भाज्या तयार करण्याच्या १०-१५ मिनिटे अगोदरच बाहेर काढून ठेवा. गॅस कमी लागेल.

♦ गॅसच्या स्वच्छतेबाबत खास दक्षता घ्या. बर्नरवर पाणी कमीत कमी टाका. बंद छिद्रे पिनेने मोकळी करा.

♦ गॅस पाईप वेळोवेळी तपासा, कधीही साधा, स्वस्त पाईप घेऊ नका. आय.एस.आय. मार्कचा पाइपच खरेदी करा.

♦ कधीही गॅसची कोणत्याही प्रकारची दुर्गंधी येताच गॅस बंद करुन एजन्सीवाल्यांना फोन करा.

♦ मुलांपासून गॅस दूर ठेवा. लहान मुलांना स्वयंपाक करताना दूर ठेवा. १२ वर्षाखालील मुलांना गॅस पेटवण्यास वा बंद करण्यास सांगू नका.

# कॉलगर्ल्सचा व्यवसाय चक्क इंटरनेटद्वारे



वेश्यावृत्ती, कॉलगर्ल हा स्त्रीजीवनाचा कलंकित भाग असला तरी पैशाच्या हव्यासापायी काही लोक तरुणींना या चिखलात ढकलतात. तर काही तरुणी स्वत:च या व्यवसायात दाखल होतात. आता तर इंटरनेटच्या माध्यमातून हायफाय कॉलगर्ल्स शोधणारे फीमेल एस्कॉर्ट्सचे जाळे देशभर झपाट्याने पसरत आहे. त्यामुळे समाजातील ही कीड कमी होण्याऐवजी वाढतच आहे. याचे कारण कमी वेळात भरपूर रक्कम आणि कामवासनापूर्ती असे दुहेरी सुख मिळत असल्यामुळे कॉलगर्ल व्यवसायाचे जाळे जास्तच मजबूत होत आहे. श्रीमंत कामपिसाट लोक या कॉलगर्लला एका रात्रीसाठी चक्क २५००० रु. पासून १ लाख रुपये देतात, अशी चर्चा आहे.

♦ नोकरी करणाऱ्या सर्वसामान्य तरुणीला इतकी रक्कम कमविण्यासाठी एक वर्षे लागते. त्यामुळे ऐशआरामी प्रवृत्तीच्या तरुणी आपण होऊन हा कमाईचा शॉर्टकट निवडतात व मानवी शरीराचे दलाल कमिशन मिळण्याच्या लालसेने या वाईट प्रवृत्तीला खतपाणी घालतात. सेक्स रॅकेटच्या जाळ्यात जवळजवळ संपूर्ण उत्तर भारत अडकला आहे. पाश्चिमात्य देशाप्रमाणेच उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश व उत्तराखंड या राज्यात इंटरनेटचा वापर करुन हाय फाय कॉलगर्ल्स शोधण्यासाठी फीमेल एस्कॉर्ट्सचे जाळेच निर्माण झाले असून यात काही खासगी कंपन्या या घृणित व्यवसायात सक्रिय असल्याचे समजते.

**असे हे रॅकेट :** चंदीगड, दिल्लीसारख्या शहरात इंटरनेटच्या माध्यमाचा गैरवापर करुन काही बहुराष्ट्रीय कंपन्या, तसेच बँका, सॉफ्टवेअर कंपन्यांमध्ये भरपूर पगारावर नोकरी करणाऱ्या तरुणींना फीमेल एस्कॉर्ट्सच्या नावावर इंटरनेमार्फत कामांधश्रीमांतान २५००० रु. पासून एक लाखापर्यंत रक्कम घेऊन पुरविण्याचे हे रॅकेट आहे. एका रात्रीच्या मजेसाठी १ लाख रुपये सहज देणाऱ्या व्यक्तीची कमाई किती व कशा प्रकारची असेल याची कल्पनाही करणे शक्य नाही.

**खुल्लमखुल्ला व्यवसाय पण...**

आश्चर्य असे की, कॉलगर्ल्सचा हा व्यवसाय चक्क इंटरनेटव्दारे खुल्लमखुल्ला चालतो पण पोलीस खाते डोळ्यावर कातडे पांघरते. पंजाबमधील बहुतेक सर्वच लहानमोठी शहरे, चंदिगड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, जम्मू काश्मिरसहित उत्तर भारतातील हायप्रोफाईल फीमेल एस्कॉर्टसची संपूर्ण माहिती मोबाईल फोन क्रमांकसुद्धा दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर या तरुणींची एका रात्रीची किंमत भारतीय व परकीय चलनात दिलेली असते.

# दागिन्यांचा बोहो ट्रेण्ड

दागिन्यांची जिला खरीखुरी आवड असते तिला त्यात भरपूर वैविध्य हवं असतं. कुंदन वर्कचे दागिने, सोन्याचे दागिने, मोत्याचे दागिने यांच्याबरोबरीने सध्या बोहोमियन पद्धतीच्या दागिन्यांची चलती आहे.

लग्न समारंभाचे दिवस जवळ येत आहेत. या दिवसांत खरेदीची रेलचेल चालू झालेली असते. काय काय आऊटफिट्स घ्यावे, त्यावर कोणत्या ॲक्सेसरीज घ्याव्यात हा विचार सतत सुरू असतो. कुंदन वर्क केलेले दागिने, सोन्याचे दागिने, मोत्याचे दागिने या नेहमीच्या प्रकारांव्यतिरिक्त हल्ली भरपूर दागिने बाजारात उपलब्ध आहेत. याबद्दलचा आजचा लेख.

केवळ मोती, सोने किंवा हिऱ्यांसारख्या पारंपरिक दागिन्यांना छेद देत डिझायनर्स सध्या बोहो पद्धतीचे दागिने तयार करताना दिसतात. केवळ वेस्टर्न आऊटफिट्स नाही, तर साडय़ा, लेहेंगा, अनारकली सूट्स या सगळ्यांवर ते शोभून दिसतात. सोने, चांदी, हिरे, मोती अशा मौल्यवान धातूंपासून बनविलेले, अत्यंत नाजूक, सुंदर कलाकुसर केलेले दागिने म्हणजे खरे दागिने अशीच दागिन्यांबद्दल सर्वसामान्य संज्ञा प्रचलित आहे; पण या साचेबद्ध संज्ञेपलीकडे जाऊन काळपट दिसणारे, भरगच्च, लांबीला मोठाले दिसतील असे रंगीबेरंगी स्टोन्स, चिवटेबावटे गोंडे यांनी सजलेल्या ज्वेलरीला सध्या खूपच मागणी आहे. या दागिन्यांना बोहेमिअन ज्वेलरी म्हटले जाते. पारंपरिक दागिन्यांना बोहेमिअन ज्वेलरीचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

बंडखोर 'स्टाईल सेन्स' बंडखोर 'स्टाईल सेन्स'

बोहेमियन ज्वेलरीचे मोटिव्हज हे फॅशनच्या बंडखोरीमधून आलेले आहेत. कोणताही ट्रेण्ड न स्वीकारता बोहेमियन ज्वेलरी बनवली जाते. तिचा वापर करून अत्यंत क्लासी लुक मिळतो. भौमितिक आकार, वेगवगेळे लहानमोठे स्टोन्स, कधीही वापरात नसतील असे काळपट डल रंग, भरपूर साखळ्या किंवा पातळ चेन्स आणि रस्ट लुक यांचा वापर करून बोहेमियन ज्वेलरी बनवली जाते.

**बोहो चोकर**

ठुशीप्रमाणे गळ्यालगत असलेले बोहो चोकर्स सध्या खूप लोकप्रिय आहेत. त्याला कधी गोंडे किंवा स्टोन्स जडवलेले असतात, तर कधी केवळ रस्ट लुक असलेले चोकर्स तुम्हाला बघायला मिळतील. ब्रॉड नेक असलेला आऊटफिट वापरणार असाल त्या वेळी तुम्ही बोहो चोकर वापरू शकता. बोहो चोकर घालणार असाल त्या वेळी बन असलेली कोणतीही हेअर स्टाइल



तुम्ही करा. त्यामुळे चोकर उठून दिसेल. नाही तर मोकळ्या केसांमुळे चोकर लपून राहण्याची शक्यता आहे. बरोबरीने एखादे लहानसे कानातले तुम्ही टीम अप करा. एखादी टिकली लावा. त्यामुळे तुम्हाला क्लासी लुक मिळेल.

**बोहो इयिरग्स**

लहान, मोठय़ा किंवा ओव्हरसाइज अशा पद्धतीने बोहो इयिरग्स तुम्हाला उपलब्ध होतील. हँगिग किंवा स्टडस् या दोन्ही प्रकारांतील बोहो इयिरग्स तुम्ही वापरू शकता. शर्ट ब्लाऊज, कॉलर ब्लाऊज, क्लोज्ड नेक ड्रेस अशा आऊटफिट्सवर तुम्ही स्टड्स पद्धतीचे बोहो इयिरग्स घालू शकता. काही वेळा बोहो इयिरग्स गोल्ड रस्ट रंगात उपलब्ध होतात. तुमच्या आऊटफिटला साजेसे इयिरग खरेदी करा. हँगिग बोहो इयिरग्ज तुम्ही ओपन नेक ड्रेसेस, ऑफ शोल्डर आऊटफिट्स, कोल्ड शोल्डर आऊटफिट्स यावर वापरू शकता. हँगिग इयिरग्जमध्ये स्टोन्स जडवलेले आढळून येतील. लहान -लहान स्टोन्स, चेन्स यांचाही वापर हँगिग बोहो इयिरग्जमध्ये होतो. गोंडे व टॅसल्सचा वापर हँगिग बोहो इयिरग्जमध्ये होतो. कुर्तीज, हेवी दुपट्टा, अनारकली सूट्स अशा आऊटफिट्सवर हे बोहो इयिरग्ज खूपच उठावदार दिसतात. हेअरस्टाइल करताना इयिरग्जमधील प्रत्येक एलिमेंट दिसेल याची काळजी घ्यावी. बन, केसांच्या वेण्या अशा पद्धतीने हेअरस्टाइल तुम्ही करा. सोबत परफेक्ट आय मेकअप करा. आणि पहा तुम्ही कशा सगळ्यांमध्ये उठून दिसताय ते.

**बोहो नेकपिसेस**

सध्या वेगवेगळ्या पद्धतींचे बोहो नेकपिसेस उपलब्ध आहेत. त्यात सिंगल चेनचे नेकपिसेस किंवा काही पदराचे नेकपिसेस उपलब्ध आहेत. हे नेकपिसेस नाजूक नसतात, तर काहीसे ओबडधोबड प्रकारात आढळतात. मोठे पेण्डंट, साखळी, गोंडे, टॅसल्स, स्टोन्स, भौमितिक आकार यांचा वापर नेकपिसेसमध्ये होतो. सिंगल चेनमध्ये किंवा काही पदरांमध्ये हे नेकपिसेस उपलब्ध असतात. लेयिरग पद्धतीमध्येही हे नेकपिसेस उपलब्ध आहेत. कॉलर आऊटफिट्स, ओपन नेक आऊटफिट्स, क्लोज्ड नेक आऊटफिट्स, ऑफशोल्डर्स किंवा कोल्ड शोल्डर आऊटफिट्सवर असे नेकपिसेस खूप छान दिसतील. त्याचा रस्ट लुक तुम्हाला क्लासी लुक मिळवून देईल. बोहो नेकपिस घालणार असाल तर त्यावर इयिरग्स घालू नका. ते चांगलं दिसणार नाही. तुमच्या आऊटफिटला शोभून दिसेल अशाच पद्धतीने बोहो नेकपिसेस वापरा. सटल लुक ठेवा.

**लहान बोहो ॲक्सेसरीज**

बोहेमियन अंगठी, हेडचेन्स, नोजपिन्स, अँकलेट्स, ब्रेसलेट्स या ॲक्सेसरीज तुमच्या आऊटफिटवर खूपच खुलून दिसतील. फक्त त्या व्यवस्थित टीम अप करणे आवश्यक आहे. त्याच्या जोडीला परफेक्ट मेकअप तुमचा लुक उठावदार करण्यास मदत करेल. स्मोकी आइज लुक बोहो ज्वेलरीवर खूपच उठावदार दिसतो.

**काही टिप्स**

-बोहो ज्वेलरी वापरताना ती व्यवस्थित टीम अप करा.

-एकाच वेळी सगळ्या ॲक्सेसरीज वापरू नका, त्यामुळे लूक भडक दिसेल.

-अँकलेट्स तुम्ही कधीही वापरू शकता.

-एकमेकांपासून दूर असलेल्या ॲक्सेसरीज एका वेळी तुम्ही घालू शकता. म्हणजेच बोहो इयिरग्स आणि बोहो ब्रेसलेट किंवा बोहो हेडचेन आणि बोहो नोजपिन असे कॉम्बिनेशन खूप छान लुक मिळवून देतात.

-स्मोकी आइज बोहो लुकसाठी परफेक्ट आहेत. आऊटफिट आणि बोहो ज्वेलरी यांचा योग्य ताळमेळ साधून तुम्ही छान लुक मिळवू शकता.

# फक्त खास प्रसंगी भेट देवू नका



बऱ्याच घरात सुखाची व्याख्या फक्त पैसा व प्रतिष्ठा यांनीच केली जाते; परंतु पैसा, प्रतिष्ठा जपताना, वाढवताना प्रेमाच्या नात्यांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे ती आकसली जातात. जर एखाद्या मोठ्या श्रीमंत, घरी सर्वजण एकत्र बसून बोलून आनंदाची देवघेव करत नसतील, तर त्या घराची श्रीमंती, सुख समृद्धी, सुखोपभोगी वस्तूंचा काय उपयोग ?

सुखदु:खाच्या बाजारात सुखासाठी सारेच धडपडत असतात. सुख व्यक्तीपरत्वे वेगवेगळ्या गोष्टीत मानले जाते. मात्र, वेगवेगळ्या प्रकारची सुखे आपल्याही नशिबी यावीत असे कोणास बरे वाटत नसे. सुख पैशाने मिळू शकत नाही.

कोट्यधीश जरी असला तरी त्याने लाखो रुपयांचा बेड खरेदी केला तरी सुखाची झोप तो त्यावरती घेऊन शकत नाही.

**मनुष्य स्वभाव :** सामाजिक प्राणी असल्यामुळेच त्याने आपल्याभोवती कुटुंब नावाचे सुरक्षाच चक्र निर्माण केले आहे. पती-पत्नीतील प्रेम व सहजीवन सुदृढ कुटुंबाचा पाया तयार करतात. काळासोबत नाती जरी जुनी झाली तरी त्यांनाही टवटवीत करण्याची रिव्हाइव्हल करण्याची गरज असते. अन्यथा ती थंड पडून भांडण, चिडचिड, दुर्लक्ष घरात घर करु लागतात. आपल्या घराची नात्याची स्थिती कशी आहे हे जाणून घेण्यासाठी स्वत:लाच विचारु काही प्रश्न.

■ आपण दिवसातील किमान दोन तास आपल्या जोडीदाराशी एकांतात घालवून मनमोकळ्या गप्पा मारतो का ?

■ आजही आपण आपल्या जोडीदाराच्या आवडी-निवडीविषयी, लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळाएवढे दक्ष आहोत का ?

■ आजही आपले शारीरिक संबंध तेवढेच ऊर्जावान आणि हवेहवेसे वाटणारे आहेत की फक्त एक रुटीन आहेत ?

■ आजही आपण उभयंतातील कोणत्याही चर्चेचे रुपांतर वादात वा परस्पर दोषारोपात होत नाही काय ?

# उंच टाचांची पादत्राने महिलांना कमी वयातच वृध्द बनवतात



उंच टाचांची फूटवेयर घालून उंची थोडीशी वाढते, महिलांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते व चालीतही डौल येतो. परंतु शरीराचा सारा भार पायांवरच असल्यामुळे फूटवेयर जसे आकर्षक असावे तसेच आरामदायकही हवेत. या दृष्टीने उंच टाचांची पादत्राणे टाळायला हवीत. त्याची ही आणखी काही कारणे –

● उंच टाचांची पादत्राणे पुढे निमुळती व खाली झुकलेली असतात व त्यांचा टाचांचा भाग खूप उंच असल्यामुळे बोटांच्या भागावर दाब पडतो त्यामुळे पायांच्या स्नायूंची शक्ती क्षीण होऊ लागते व पिंड्यामध्ये कायमस्वरूपी वेदना होऊ लागतात.

● हायहील पादत्राणे रोज वापरल्यास त्याचा संपूर्ण शरीरावर परिणाम होतो आणि गर्भावस्थेत अशी सॅण्डल्स घातल्यास गर्भपाताचाही धोका असतो.

● उंच टाचांची पादत्राणे महिलांना कमी वयातच वृद्ध बनवतात. उंच टाचांच्या पादत्राणांमुळे कॅलकेनियम हाड वाढते व टाचेसोबतच कंबर व शरीरातील इतर हाडांतही वेदना होण्याचे कारण बनते.

● एवढेच नव्हे तर उंच टाचांच्या पादत्राणांमुळे बऱ्याचदा नसांमध्ये सूजही येते.

● खेळताना, पर्वतारोहणात, पिकनिकसाठी, फिरायला जाताना उंच टाचांची पादत्राणे निरूपयोगी ठरतात.

● उंच टाचांची पादत्राणे घालून चालताना त्रास होतो. जर पळत जाऊन बस पकडायची असेल तर पाय लचकण्याचीही शक्यता असते.

● बऱ्याचदा हायहील पादत्राणे घालून चालताना त्रास होतो. जर पळत जाऊन बस पकडायची असेल तर पाय लचक ण्याचीही शक्यता असते.

● बऱ्याचदा हायहील पादत्राणे घालून पडल्यामुळे हाड मोडण्याचीही शक्यता असते.

● उंच टाचांच्या पादत्राणांमुळे शरीरावर अवाजवी भार पडतो. पायांची स्थिती शिडीप्रमाणे होते जी डोळ्यांच्या दृष्टीवर परिणाम करते.

उंच टाचांची पादत्राणे निसर्गनियमाविरूद्ध आहेत. कारण त्यांच्यामुळे शरीराच्या वजनाचे गुरुत्व केंद्र बदलते. जर आपण आपली उंची जास्त दर्शवू इच्छित असाल तर सर्व बाजूंनी उंच असलेली पादत्राणे वापरा.

●●●

# कला विश्व



## ९ वर्षे लिव्ह इन, ब्रेकअप झालं अन् घटस्फोटित भारतीय खेळाडूबरोबर थाटला संसार

अनेक बॉलीवूड अभिनेत्रींनी घटस्फोटित अभिनेत्यांशी, खेळाडूंशी लग्न केले आहे. अशीच एक अभिनेत्री व माजी 'मिस युनिव्हर्स' तिच्या अफेअर्स व लग्नामुळे चर्चेत राहिली. या अभिनेत्रीचं नाव लारा दत्ता. इंडस्ट्रीत दोन दशकांपेक्षा जास्त काळापासून सक्रिय असलेल्या लाराच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेऊयात.

२००३ मध्ये रिलीज झालेल्या 'अंदाज' या चित्रपटातून लाराने बॉलीवूडमधील करिअरला सुरुवात केली होती. या चित्रपटात प्रियांका चोप्रा व अक्षय कुमार यांच्या मुख्य भूमिका होत्या. चित्रपटातील लाराच्या सौंदर्याने चाहत्यांना भुरळ घातली होती. लारा तिच्या चित्रपटांपेक्षा अफेअर्समुळेही राहिली. ती तिच्या बॉयफ्रेंडबरोबर जवळपास ९ वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये होती. या नात्याचा तिच्या करिअरवरही बराच परिणाम झाला.

केली दोरजीबरोबर अफेअर होतं. केली हा मॉडेल असून दोघे ९ वर्षे नात्यात होते. त्यांचं नातं जगजाहीर होतं, त्यामुळे ते लग्न करतील, असं वाटत होतं. पण, अचानक त्यांच्या ब्रेकअपची बातमी आली. अभिनेता डिनो मोरिया हे नातं तुटण्यास कारणीभूत असल्याचं म्हटलं जातं. केलीला लारा व डिनोचं अफेअर असल्याची शंका होती, त्यामुळे ब्रेकअप झालं असं बोललं जातं.

केलीपासून वेगळी झालेली लारा नंतर भारतीय टेनिसपटूच्या प्रेमात पडली. तिने महेश भूपतीशी १६ फेब्रुवारी २०११ रोजी लग्नगाठ बांधली. वर्षभराने २०१२ मध्ये ते मुलगी सायराचे आई-वडील झाले. लाराशी लग्न करण्यापूर्वी महेशचं एक लग्न मोडलं होतं. महेशच्या पहिल्या बायकोचं नाव श्वेता जयशंकर होतं. ती मॉडेल होती. लग्नाच्या सात वर्षांनी त्यांचा घटस्फोट झाला आणि नंतर महेशने लाराशी लग्न केलं होतं.

लारा आता चित्रपटांमध्ये फार सक्रिय नाही. ती कोट्यवधीच्या संपत्तीची मालकीण आहे. लाराची एकूण संपत्ती जवळपास ५३ कोटी रुपये आहे. ती एका चित्रपटासाठी १-२ कोटी रुपये मानधन घेते. तसेच ती जाहिरातींमध्ये काम करते. लाराने तिच्या करिअरमध्ये 'मस्ती', 'काल', 'नो एंट्री', 'भागम भाग', 'पार्टनर', 'हाउसफुल', 'डॉन २' अशा अनेक चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत.



## रणदीप हुड्डाने 'या' कारणामुळे नाकारलेला 'रंग दे बसंती' चित्रपट

ओमप्रकाश मेहरा यांचा २००६ साली प्रदर्शित झालेला 'रंग दे बसंती' हा चित्रपट चांगलाच गाजला. आमिर खान, आर माधवन यांची प्रमुख भूमिका चित्रपटात पाहायला मिळाली.

अभिनेता रणदीप हुड्डालादेखील राकेश ओमप्रकाश मेहरा यांनी या चित्रपटासाठी ऑफर दिली होती. मात्र, अभिनेत्याने राम गोपाल वर्मा यांच्या चित्रपटासाठी ही ऑफर नाकारली. आता नुकत्याच एका मुलाखतीत या चित्रपटाची भूमिका नाकारून एक मोठी संधी गमावल्याबद्दल अभिनेत्याने खेद व्यक्त केला आहे.

शुभंकर मिश्राच्या पॉडकास्टमध्ये रणदीप हुड्डाने हजेरी लावली होती. यावेळी 'रंग दे बसंती' चित्रपटात काम न करण्याबाबत रणदीप हुड्डा म्हणाला, रंग दे बसंती चित्रपटात मला भगत सिंगची भूमिका करण्यासाठी विचारले होते, पण मी नकार दिला. त्यानंतर ती भूमिका सिद्धार्थने साकारली. मी जर 'रंग दे बसंती'मध्ये काम केले असते तर मी आता वेगळ्या प्रकारचे काम करीत असतो. मी ऑडिशन दिली होती आणि मला ते आवडले होते. राकेश ओमप्रकाश काहीवेळा माझ्याकडे येत असत. कधी कधी दारू पिऊन गाडी चालवत असत. ते मला म्हणायचे की, तू चित्रपटात काम कर.

रणदीप हुड्डा पुढे म्हणाला, मला रंग दे बसंती चित्रपटात काम करायचे होते, त्यावेळी इंडस्ट्रीमध्ये माझे दोनच ओळखीचे लोक होते. एक माझी गर्लफ्रेंड आणि दुसरे रणदीप हुड्डा होते. माझ्या गर्लफ्रेंडने मला सांगितले की तू कोणतीही छोटी भूमिका करू नको. त्याचदरम्यान राम गोपाल वर्मा मला म्हणाले की मी तुला डी या चित्रपटात प्रमुख कास्ट करण्याचा विचार करत आहे. पोस्टरमध्ये तू आमिर खानच्या मागे उभा राहशील असे त्यांनी मला सांगितले. जाट लोकांना जसा पटकन राग येतो, तसा मला राग आला. अहंकार बाहेर आला. मी त्यांना सांगितलं की मी आमिर खानच्या मागे उभा राहणार नाही, अशाच प्रकारे मी 'रॉक ऑन' हा चित्रपटसुद्धा सोडला.

करिअरला पुढे नेणाऱ्या भूमिका बाजूला सारून तू वेगळ्या भूमिका साकारण्याला प्राधान्य का दिले? यावर उत्तर देताना रणदीप हुड्डा म्हणाला, मी कायम वेगळ्या चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शकांबरोबर काम केले आहे, जे इंडस्ट्रीमध्ये आधीपासूनच आहेत, त्यांच्याबरोबर मी कमी काम केले आहे. कदाचित त्यामुळे माझी प्रगतीदेखील हळूहळू होत आहे. मला आधी असे वाटायचे की, माझी कला पुरेशी आहे, पण प्रत्यक्षात असे दिसत नाही.

# देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : डिजिटल शिक्षणाच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली असून महाज्ञानदीप या ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधांचे लोकाभिमुखीकरण करण्यासाठी देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू झाले असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

मुंबईत महाज्ञानदीप' पोर्टलचा शुभारंभ उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त

### 'महाज्ञानदीप' ऑनलाईन पोर्टलचा शुभारंभ

मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेश देवळाणकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सजीव सोनवणे, आयआयटी गांधीनगरचे प्रा. समीर सहस्त्रबुद्धे तसेच राज्यातील विविध विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव, प्राध्यापक, विविध विद्याशाखांचे संचालक उपस्थित होते. तसेच वरिष्ठ अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे या शुभारंभ कार्यक्रमास सहभागी झाले होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, महाज्ञानदीप'



उपक्रमांतर्गत एक हजार (Massive open online course - MOOC) तज्ज्ञ प्राध्यापक घडवण्याचा संकल्प आहे. आतापर्यंत १५० प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी-२०२०) अंतर्गत 'भारतीय ज्ञान प्रणाली - जेनेरिक' (आयकेएस - इंडियन नॉलेज सिस्टीम- जेनेरिक) हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला आहे. हा अभ्यासक्रम या पोर्टलवर अपलोड करण्यात आला असून जगभरातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण ऑनलाईन सहज एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई यांचा समावेश आहे.

# श्री क्षेत्र चौंडी विकास आराखड्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी : प्रा. राम शिंदे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती पुढील महिन्यात दिनांक ३१ मे, २०२५ रोजी येत आहे. त्यानिमित्त त्यांचे जन्मगाव चौंडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर येथे देशभरातील पर्यटक आणि इतिहासप्रेमींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती देणाऱ्या श्री क्षेत्र चौंडी विकास आराखड्या संदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिले.

विधान भवन येथे सभापती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी संबंधितांना निर्देशित केले. यावेळी मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांची विशेष उपस्थिती होती. मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर तर दूरदृष्यप्रणालीद्वारे नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बावीस्कर यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री क्षेत्र चौंडी विकास आराखडा हा सर्व दृष्टीने परिपूर्ण असावा, तसेच जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर सर्व संबंधित विभागांची चौंडी येथे बैठक घेऊन आराखड्याच्या कामास गती द्यावी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळाचे सुशोभीकरण करणे, त्यांनी संदेश दिलेल्या जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन संकल्पनांची जपणूक करण्याच्या दृष्टीने या आराखडयास प्राधान्य द्यावे. चौंडी येथे देशभरातून येणाऱ्या पर्यटकांसाठी सुव्यवस्थित रस्ते, संग्रहालय, महादेव मंदिर आणि चौंडीश्वरी मंदिर जीर्णोद्वार, निवास व्यवस्था, सुसज्ज वाहनतळ, स्थानिक उत्पादने, खाद्यपदार्थ यांची बाजारपेठ या सोयीसुविधांना प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात याव्या, याबाबतचा प्रस्ताव तत्परतेने सादर करण्याबाबत सभापती प्रा.राम शिंदे आणि मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांनी सूचित केले.

# तमाशा व कलाकेंद्र कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती गठीत

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी घेतला आहे.

या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फडमालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ड.शेलार यांनी दिली.

तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा



फड मालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील.

कलाकेंद्र तक्रार निवारण समितीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून असतील. या समित्यांचा कार्यकाळ ३० दिवसांचा असून, आवश्यकतेनुसार या क्षेत्रातील इतर अभ्यासक, कलाकार आणि कलाकेंद्र चालक यांनाही पाचारण करण्यात येणार आहे. या समित्यांमार्फत प्राप्त होणाऱ्या शिफारसीनुसार शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

# अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करा : कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी कुरकुंभ (ता. दौंड जि. पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रात संयुक्तीकरित्या मोहिम राबवून कारखान्याद्वारे होणाऱ्या प्रदूषणाचे नमुने घेऊन आवश्यक कार्यवाही करावी. या मोहिमेमध्ये संबंधीत ग्रामपंचायत प्रतिनिधी सुध्दा घ्यावेत, असे निर्देश कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित झालेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने कामगार विभागाने बैठक आयोजित करणे तसेच पुणे जिल्ह्यातील कुरकुंभ येथील अल्कली अमाइन्स



कंपनीमध्ये नुकताच झालेला स्फोट आणि त्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीसंदर्भात उद्योग विभाग, पर्यावरण विभाग आणि कामगार विभाग यांची बैठक कामगार मंत्री ड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस आमदार राहुल कुल, कुरकुंभ एमआयडीसीमधील संबंधित अधिकारी, रासायनिक उद्योग प्रतिनिधी, पर्यावरण विभाग, कामगार विभाग, संबंधित ग्रामपंचायत प्रतिनिधी तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी परिसरातील सुरक्षेच्या उपाययोजनांची माहिती दिली. कुरकुंभ परिसरात बहुसंख्य रासायनिक उद्योग कार्यरत असल्याने संभाव्य अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक असल्याचे मत मंत्री ड.फुंडकर यांनी व्यक्त केले. त्यांनी त्वरित उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्र पथक गठित करून औद्योगिक परिसराची सखोल तपासणी करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

# प्रवाशांना चांगली सुविधा न देणाऱ्या हॉटेल-मोटेलवरील थांबे रद्द करा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

जनप्रवास : प्रतिनिधी


मुंबई : लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री . प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल पुढील १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.

लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस विविध हॉटेल-मोटेल थांब्यावर थांबतात. तेथे प्रवाशांना चहा -नाष्टा अथवा जेवण तसेच नैसर्गिक विधीसाठी वेळ दिला जातो. परंतु अनेक हॉटेलमधील थांब्या बाबत प्रवाशांच्या तक्रारी येत असून प्रामुख्याने प्रसाधनगृहे अस्वच्छ असणे, फराळाचे जिन्नस शिळे, अशुद्ध व महाग असणे, याचबरोबर संबंधित हॉटेल वरील कर्मचारी व मालकांची वर्तणूक एस टी प्रवासांच्या सोबत अत्यंत वाईट असणे अशा प्रकारच्या तक्रारी



उद्भवत आहेत.

या तक्रारीची गंभीर दखल घेऊन मंत्री सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला याबाबत कडक धोरण स्वीकारण्याची निर्देश दिले आहेत. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता प्रवाशांच्या आरोग्याची कोणती तडजोड न करता संबंधित हॉटेल-मोटेल थांब्यावर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले आहेत. तसेच सध्या संपूर्ण राज्यभरात सुरू असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्याचे नव्याने सर्वेक्षण करून तेथील प्रवासी सुविधांची चाचपणी करावी. जे थांबे प्रवाशांना योग्य सुविधा देत नसतील त्यांच्यावर कारवाई करावी व नव्या थांब्यांना मंजुरी द्यावी. तसेच याबाबतचा सविस्तर अहवाल येत्या १५ दिवसात आपल्याला सादर करावा असे निर्देशित त्यांनी दिले आहेत.



# कामगारांनी कोणत्या संघटनेसोबत जावे याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य

## कामगार राज्यमंत्री आशिष जैयस्वाल

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : कामगारांनी कोणत्या संघटनेसोबत काम करावे याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्यामुळे बॉम्बे रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने सर्व कामगार संघटनांशी चर्चेची भूमिका घ्यावी, असे निर्देश कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिले.

मंत्रालयात बॉम्बे रुग्णालयातील रुग्णसेविका आणि कामगार यांच्या विविध प्रश्नांबाबत बैठक संपन्न झाली. त्यावेळी राज्यमंत्री श्री.जयस्वाल बोलत होते. याबैठकीस राष्ट्रीय कामगार सेनेचे अध्यक्ष किरण पावसकर, बॉम्बे रुग्णालयाचे व्यवस्थापक राजन चव्हाण यांच्यासह राष्ट्रीय कामगार सेनेचे पदाधिकारी आणि कामगार आयुक्तालयाचे अधिकारी उपस्थित होते.

कामगार आयुक्तांनी रुग्णालय व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्या सोबत एकत्रिक बैठक घ्यावी अशा सूचना देऊन राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले की, भविष्यात रुग्णसेवकांबाबत कोणत्याही तक्रारी होणार नाहीत याची रुग्णालय प्रशासनाने दक्षता घ्यावी. तसेच यावेळी बॉम्बे हॉस्पिटल ट्रस्ट, मुंबई येथे रुग्णांना देण्यात येणाऱ्या १० टक्के सवलतीच्या बेडचा दुरूपयोग होत असल्याबाबतही आढावा घेण्यात आला. याबाबत समिती स्थापन करून अहवाल सादर करण्याच्या सूचना राज्यमंत्री श्री. जयस्वाल यांनी दिल्या.

यावेळी विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, अवर सचिव स.द .कस्तुरे, धर्मादाय सहआयुक्त सुनीता तरार, बॉम्बे हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय प्रतिनिधी व सरचिटणीस स्थानिक कमिटी दीपक जामदार उपस्थित होते.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सवात विविध उपक्रम राबवणार

## कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचला पाहिजे, खऱ्या अर्थाने अंत्योदयांच्या माध्यमानेच लोकशाहीच्या उदिष्टांची पूर्ती होईल, हा मौलिक विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला. त्यांच्या विचारांवर आधारित पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राज्यभरात राबवण्यात येणार आहे. या महोत्सवात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहे शासनाच्या सर्व विभागांनी तसेच जिल्हास्तरावर हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा असे कौशल्य विकास,उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी निर्दे श दिले.

राज्यात २२ ते २५ एप्रिल२०२५ या कालावधीत पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राबवण्यात येणार आहे याबाबत मंत्रालयात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विकास विभागाच्या अपर सचिव मनीषा वर्मा, दिव्यांग कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दीनदयाळ संशोधन संस्थेचे सचिव अतुल जैन उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते. या महोत्सावासाठी शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन महोत्सव समिती स्थापन केली असून या समितीचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा अध्यक्ष आहेत. मानव कल्याण यासंदर्भातील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे मौलिक विचार समाजात रुजावेत या उद्देशाने देशभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्म हीरक महोत्सव साजरा होणार आहे. देशभरात या महोत्सवाला सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी या बैठकीत दिली. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य, विचार प्रणाली, एकात्म मानवदर्शन आदि बाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात पंडितजींच्या विचारांवर आधारित एक लाख पुस्तिकांचे वितरण करण्यात येणार आहे.

* संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com